


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ६१ * नांदेड * शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# महाराष्ट्रातून राज्यसभेच्या सर्व ७ जागा बिनविरोध



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यसभेच्या निवडणुकीसाठी भाजपकडून चार, राष्ट्रवादीकडून एक आणि शिवसेनेकडून एक असे सहा अर्ज दाखल झाले आहेत. तर दुसऱ्या बाजूला महाविकास आघाडीकडून शरद पवारांचा अर्ज दाखल झाला आहे. त्यामुळे ही निवडणूक आता बिनविरोध झाल्याचं समोर आलं आहे.

महाराष्ट्र विधानसभा सदस्यांमधून राज्यसभेवर निवडून जाणाऱ्या ७ जागांपैकी भाजपने विधानसभेतील आपल्या संख्याबळानुसार ४ उमेदवारांच्या नावाची घोषणा बुधवारी केल्यानंतर महाविकास आघाडीकडून शरद पवार यांना उमेदवारी देण्यात आली होती. राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षाकडून अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार यांना तर शिवसेना शिंदे गटाकडून ज्योती वाघमारे यांना संधी देण्यात आली असून ही निवडणूक बिनविरोध पार पडणार आहे.

पक्षाच्या राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची भूमिका निभावणारे विनोद तावडे यांना अपेक्षेप्रमाणे राज्यसभेवर पाठवण्याचा निर्णय झाला आहे. तब्बल सहा वर्षांनंतर तावडे हे पुन्हा एकदा संसदीय राजकारणात परतणार आहेत. भाजपचा मित्रपक्ष असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) प्रमुख रामदास आठवले यांना पुन्हा एकदा भाजपने राज्यसभेवर पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय, माया ईवनाते आणि रामराव वडकुते यांना राज्यसभेची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. नागपूरच्या माजी महापौर राहिलेल्या माया ईवनाते या भाजपचा राज्यातील महत्त्वाचा आदिवासी चेहरा आहेत. त्या अनुसूचित जमाती राष्ट्रीय आयोगाच्या सदस्या होत्या. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या निकटवर्तीय म्हणून त्यांची ओळख असून, त्यांच्या निवडीतून भाजपने विदर्भातील आदिवासी मतांचे समीकरण साधले आहे. धनगर समाजाचे प्रतिनिधित्व करणारे रामराव वडकुते यांनी अहिल्यादेवी होळकर शेळी-मेंढी विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणून दीर्घकाळ काम केले आहे.

### एकनाथ शिंदेंचं धक्कातंत्र, नवख्या चेहऱ्याला संधी

राज्यसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा ट्विस्ट पाहायला मिळाला आहे. नव्या चेहऱ्याला संधी देण्याची चर्चा रंगत असतानाच अखेर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून ज्योती वाघमारे यांचे नाव निश्चित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे अनेक ज्येष्ठ नेत्यांचे अंदाज चुकल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

मराठवाड्यातील हिंगोलीतील माजी विधानपरिषद सदस्य व राष्ट्रवादीतून भाजपमध्ये आलेल्या वडकुते यांना अनपेक्षितरित्या राज्यसभेची लॉटरी लागली आहे. वडकुते हे धनगर समाजातून येतात. परभणी-हिंगोली भागात धनगर समाज मोठ्या प्रमाणात असल्याने भाजपाने हा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. राज्यसभेचे सर्व ७ उमेदवारी गुरुवारी विधिमंडळात आपापले अर्ज दाखल केले आहेत.

महाविकास आघाडीतून राज्यसभेच्या एका जागेसाठी शिवसेना (ठाकरे), कॉंग्रेस, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार अशा तिन्ही पक्षांनी दावा केला होता. महाविकास आघाडीत २० आमदार असणारा शिवसेना (ठाकरे) पक्ष हा सर्वात मोठा पक्ष आहे. त्यामुळे ठाकरेंनी राज्यसभेवर दावा केला होता. प्रियंका चतुर्वेदी यांना पुन्हा संधी देण्याचे शिवसेनेचे प्रयत्न होते. दुसरीकडे कॉंग्रेसला राज्यसभेत विरोधी पक्षनेतेपद टिकवून ठेवण्यासाठी दोन जागांची गरज होती. त्यामुळे कॉंग्रेसनेही राज्यसभेची जागा मिळावी अशी दोन्ही मित्रपक्षाकडे मागणी केली. मात्र, शरद पवारांनी पुन्हा एकदा राज्यसभेत जाण्याचा निर्णय घेतला होता.

# रोमांचक सामन्यात इंग्लंडचा पराभव करून टीम इंडिया फायनलमध्ये!

## रविवारी भारतविरूद्ध न्यूझीलंडमध्ये अंतिम सामना

**मुंबई (प्रतिनिधी)–** वानखेडेच्या ऐतिहासिक मैदानावर टीम इंडियाने पुन्हा एकदा विजयाचा झेंडा फडकवला आहे. टी-२० विश्वचषक २०२६ च्या दुसऱ्या उपांत्य फेरीत भारताने बलाढ्य इंग्लंडचा ७ धावांनी धुव्वा उडवत दिमाखात अंतिम फेरीत प्रवेश केला. संजू सॅमसन, ईशान किशन आणि शिवम दुबे यांच्या वादळी फलंदाजीच्या जोरावर भारताने २५३ धावांचा डोंगर उभा केला होता, ज्यासमोर इंग्लंडकडून जेकब बेथेल हा शेवटपर्यंत एकटा नडला. इंग्लंडचा संघ २४६ धावांत गारद झाला. आता टी-२० विश्वचषक २०२६ चा अंतिम सामना रविवारी भारत आणि न्यूझीलंड यांच्यात जगातील सर्वात मोठ्या क्रिकेट मैदानावर अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर रंगणार आहे.

सेमीफायनलमध्ये इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रूकने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, भारताची सुरुवात काहीशी निराशाजनक झाली. सलामीवीर अभिषेक शर्मा पुन्हा एकदा अपयशी ठरला. त्याने ७ चेंडूत २ चौकारांच्या मदतीने केवळ ९ धावा केल्या. पण, यानंतर संजू सॅमसन आणि ईशान किशन यांनी डाव सावरत भारतीय संघाला शंभरी पार करून दिली. ईशान किशनने आक्रमक फलंदाजी करत १८ चेंडूत ३९ धावा केल्या.

दुसऱ्या बाजूला संजू सॅमसनने तांडव घातला आणि अर्धशतक झळकावले. तो ४२ चेंडूत ७ चौकार आणि ७ षटकारांच्या जोरावर ८९ धावा करून बाद झाला. सॅमसन बाद झाल्यानंतर शिवम दुबेने तुफानी फलंदाजी करत २५ चेंडूत ४३ धावा ठोकल्या. मात्र, दुर्दैवाने तो धावबाद झाला. दुसरीकडे सूर्यकुमार यादव पुन्हा एकदा अपयशी ठरला. त्याने ६ चेंडूत ११ धावा करून विकेट गमावली. यानंतर तिलक वर्माने अवघ्या ७ चेंडूत ३ षटकारांसह २१ धावांची झंझावाती खेळी केली, तर हार्दिक पांड्याने १२ चेंडूत २७ धावा करत संघाची धावसंख्या वेगाने वाढवली. या आक्रमक फलंदाजीच्या जोरावर भारताने २० षटकांत ७ बाद २५३ धावांचा प्रचंड डोंगर उभारला.

२५४ लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात पण धक्कादायक झाली. हार्दिक पांड्याने दुसऱ्या षटकांच्या पहिल्याच चेंडूवर भारताला पहिलं यश मिळवून दिलं, त्याने फिल साल्टला आऊट केलं. तो फक्त पाच धावा करू शकला. त्यानंतर हॅरी ब्रूकही मोठी खेळी करू शकला नाही, तो ७ धावा करून जसप्रीत बुमराहच्या चेंडूवर अक्षर पटेलकडे झेल देत माघारी परतला.

# युद्धाला १०० तास; एक हजारांवर मृत्यूमुखी, १७ इराणी जहाजे बुडाली

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अमेरिका-इस्त्रायल-इराण युद्धाचा सहावा दिवस आहे. अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्याला १०० तास पूर्ण झाले आहेत. इस्त्रायल आणि अमेरिकेने आतापर्यंत इराणवर ५ हजारहून अधिक बॉम्ब टाकले आहेत आणि २० इराणी युद्धनौका उद्धवस्त केल्या आहेत. या हल्ल्यांमध्ये एक हजारहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे.

इराणने मध्यपूर्वेतील नऊ देशांमधील अमेरिकेच्या तळांवर हल्ला करून प्रत्युत्तर दिले. दुसरीकडे बुधवारी, अमेरिकेने श्रीलंकेजवळ भारताहून परतणाऱ्या इराणी युद्धनौके आयआरआयएस देना या जहाजावर हल्ला करून ते बुडाले. ही एक प्रकारे भारतीय मालकीच्या हिंद महासागरात अमेरिकेची घुसखोरी असल्याचा आरोप होत आहे. अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवर २८ फेब्रुवारी रोजी केलेल्या इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खोमेनी यांच्यासह ४८ नेते मारले गेले आहेत.

# वाढत्या उन्हामुळे जिल्ह्यातील सर्व शाळा सकाळ सत्रात भरणार; शिक्षण विभागाने काढले आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात उन्हाचा तडाखा वाढू लागल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम टाळण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या वेळेत बदल करण्यात आला असून, आता शाळा सकाळी भरवण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

शिक्षण विभागाने (प्राथमिक) जारी केलेल्या पत्रानुसार, ६ मार्च २०२६ रोजीपासून एका सत्रात भरणाऱ्या शाळा आता सकाळी ८.३० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत राहणार आहे. यामध्ये शाळेची मधली सुट्टी २० मिनीटांची असेल. ही वेळ ११ ते ११.२० राहणार आहे. दुपारच्या सत्रात भरणाऱ्या शाळांनी सुद्धा त्यांच्या वेळेत बदल करून, आवश्यक तासिका पूर्ण होतील अशा पद्धतीने मुख्याध्यापकांनी नियोजन करावे व त्याचे वेळापत्रक गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे सादर करावे.

या बदलामुळे आर.टी.ई. अधिनियम २००९ मधील तरतुदींचा भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच शैक्षणिक वर्षातील कामाचे किमान दिवस आणि तासिका कमी होणार नाहीत, याची नोंद मुख्याध्यापकांनी घ्यायची आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने हा निर्णय घेण्यात आला आहे. मार्च महिना सुरू होताच उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली आहे. दुपारच्या वेळी मुलांना शाळेतून घरी जाताना उष्माघाताचा (Heat stroke) त्रास होऊ शकतो. यासाठी अनेक शिक्षक संघटनांनी ही शाळेच्या वेळेत बदल करावा अशी मागणी केली होती. त्या मागणीची दखल घेत प्रशासनाने हा विद्यार्थीभिमुख निर्णय घेतला आहे.

# महाराष्ट्रानं दिलेलं प्रेम, विश्वास आणि पाठबळ हेच आयुष्याच्या ऊर्जेचे खरे स्रोत

## शरद पवारांनी मित्रपक्षांचे मानले आभार



**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रातील जनतेने पुन्हा एकदा पुढील सहा वर्षे सेवा करण्याची संधी देऊन माझ्यावर मोठा विश्वास दाखवला आहे. या विश्वासाबद्दल मी महाराष्ट्राच्या जनतेचा तसेच माझ्या सर्व मित्रपक्षांचा मनापासून ऋणी असल्याचे शरद पवार म्हणाले.

१९६७ पासून माझा लोकप्रतिनिधी म्हणून प्रवास सुरू झाला आणि आजपर्यंत तो अखंडपणे सुरू आहे. हा प्रदीर्घ प्रवास केवळ माझा नसून महाराष्ट्राच्या जनतेचा आहे, कारण त्यांनी दाखवलेल्या विश्वासामुळे आणि पाठिंब्यामुळेच हा संसदीय प्रवास कधीही खंड न पडता पुढे सुरू ठेवणे मला शक्य झाले.

१९६७ मध्ये प्रथम महाराष्ट्रात विधानसभेवर निवडून जाण्याची संधी मिळाली. सार्वजनिक जीवनात आणि राजकारणात सातत्याने काम करत असताना लोकांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाच्या बळावर राज्यात मंत्री, मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेता अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडण्याची संधी मिळाली. तसेच केंद्रात संरक्षणमंत्री आणि दहा वर्षे कृषीमंत्री म्हणून काम करण्याची जबाबदारीही मला मिळाली. या सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना महाराष्ट्रासाठी तसेच देशासाठी सकारात्मक काम करता आले, यामागे जनतेचा विश्वास हेच माझ्यासाठी सर्वात मोठे बळ राहिले आहे, असेही ते म्हणाले.

### शरद पवार यांच्या घरी जाऊन निवडणूक अधिकाऱ्यांनी उमेदवारी अर्ज स्वीकारला

आरोग्यासह कुठल्या ही वैध कारणास्तव उमेदवार प्रत्यक्ष उपस्थित नसेल तर संविधानाच्या कलम ८४ अ प्रमाणे विहीत नमुन्यात शपथपत्र सादर करणे अनिवार्य असते. शरद पवार यांनी महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. मात्र महाराष्ट्रात पहिल्यांदाच प्रत्यक्ष उपस्थित न राहता अशा पद्धतीने शरद पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस आज मांडणार अर्थसंकल्प

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून, शुक्रवारी ६ मार्च रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सन २०२६-२७ या वर्षाचा अर्थसंकल्प मांडणार आहेत. गेल्या दशकाभरापासून राज्याच्या आर्थिक नियोजनावर आपली पकड ठेवणारे आणि तब्बल ११ वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम नावावर असलेले अजित पवार यावेळी सभागृहात नसतील. त्यांच्या अनुपस्थितीत राज्याच्या तिजोरीचे व्यवस्थापन आणि 'आर्थिक इंजिना'ची गती कायम राखण्याचे मोठे आव्हान फडणवीस यांच्यासमोर असणार आहे.

# जिष्णू देव वर्मा महाराष्ट्राचे नवे राज्यपाल

## अनेक राज्यपाल बदलले

**मुंबई (प्रतिनिधी)–** तेलंगणाचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची आता महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर तेलंगणाच्या राज्यपालपदी हिमाचल प्रदेशची जबाबदारी असलेल्या शिव प्रताप शुक्ला यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी जिष्णू देव वर्मा यांच्या नावाची घोषणा केली. ईशान्य भारतातील अनुभवी राजकारणी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिष्णू देव वर्मा यांनी त्रिपुरा राज्याच्या राजकारणात दीर्घकाळ महत्त्वाची भूमिका बजावली आहे.



त्रिपुराच्या राजघराण्याशी संबंधित असलेले जिष्णू देव वर्मा हे भाजपचे ज्येष्ठ नेते मानले जातात. २०१८ ते २०२३ या कालावधीत त्यांनी त्रिपुराचे उपमुख्यमंत्री म्हणून काम करत राज्याच्या वित्त, ऊर्जा आणि ग्रामीण विकासासारख्या महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी सांभाळली होती.


२०१८ मध्ये त्रिपुरात भाजप सत्तेत आल्यानंतर जिष्णू देव वर्मा यांना उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली. त्या काळात त्यांनी वित्त, ऊर्जा, नियोजन, पंचायत राज आणि ग्रामीण विकास यांसारख्या विभागांचे नेतृत्व केले.

२०१८ ते २०२३ या कालावधीत त्रिपुराच्या प्रशासनात जिष्णू देव वर्मा यांची भूमिका महत्त्वाची मानली जाते. आर्थिक नियोजन, ग्रामीण पायाभूत सुविधा आणि ऊर्जा क्षेत्रातील सुधारणा यावर त्यांनी भर दिला. राज्याच्या विकासासाठी केंद्र सरकारच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. त्यामुळे त्रिपुराच्या विकास प्रक्रियेत त्यांच्या नेतृत्वाची नोंद घेतली जाते.

# अखेर भारताकडून खामेनींच्या मृत्यूवर शोकसंदेश जारी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** इराणचे सर्वोच्च नेते अय्यातुल्ला खामेनी यांच्या मृत्यूनंतर भारताने त्याचा निषेध केला नाही किंवा त्यावर कोणतंही भाष्य केलं नाही, त्यावरून अनेकदा प्रश्न उपस्थित केले जात होते. कॉंग्रेससह अनेक विरोधी पक्षांनी भारताच्या परराष्ट्र धोरणावर टीका केली होती. त्यानंतर आता भारताने अधिकृतरित्या खामेनींच्या मृत्यूवर शोकसंदेश जारी केला. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी नवी दिल्लीतील इराणच्या दूतावासात जाऊन शोकपुस्तिकेवर स्वाक्षरी केली आणि इराणचे मृत सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांना श्रद्धांजली वाहिली.

इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्लयामध्ये सर्वोच्च नेते अय्यातुल्ला खामेनी यांचा मृत्यू झाला. त्यानंतर खामेनी यांच्या मृत्यूनंतर त्यावर जगभरातून प्रतिक्रिया आली. असं असतानाही भारताने त्यावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नव्हती, किंवा भाष्य करणं टाळलं. त्याचवेळी इराणने सौदी अरबमधील अमेरिकन तळावर हल्ला केल्यानंतर मात्र भारताने त्याचा निषेध केल्याचं दिसून आलं.




# धर्मांतरणविरोधी विधेयकाला मंत्रिमंडळाची मंजुरी; लवकरच सभागृहात

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सक्तीच्या धर्मांतराविरोधातील मसुद्याला मंजुरी देण्यात आली. या विधेयकाचा मसुदा लवकरच विधानसभेत मांडला जाणार आहे.

सक्तीच्या धर्मांतराविरोधात कायदा लागू करण्यासाठी राज्य सरकारनं महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. प्रस्तावित विधेयकाच्या मसुद्याला मंत्रिमंडळानं मंजुरी दिली असून कायद्यात रूपांतरित करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. या विधेयकानुसार कोणत्याही व्यक्तीचं जबरदस्तीनं, फसवणुकीनं किंवा प्रलोभन देऊन धर्मांतर केल्यास संबंधित व्यक्तीवर अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येईल. तसेच अटकही केली जाऊ शकते.

सक्तीच्या धर्मांतराविरोधात मंत्री नितेश राणे यांनी सांगितलं की, सक्तीच्या धर्मांतराच्या विरोधात अनेक हिंदुत्ववादी संघटना आणि सामाजिक कार्यकर्ते गेल्या अनेक वर्षांपासून आंदोलन करत होते. त्या मागण्या लक्षात घेऊन राज्य सरकारनं हा निर्णय घेतला आहे. याबाबत पुढे बोलताना मंत्री राणे म्हणाले, यापुढे कोणत्याही हिंदू भगिनीकडं वाकड्या नजरेनं पाहण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही. मिशनऱ्यांकडून होणारे धर्मांतर किंवा लव्ह जिहादसारखे प्रकार आता खपवून घेतले जाणार नाहीत. ज्या कार्यकर्त्यांनी यासाठी मोर्चे काढले, संघर्ष केला आणि काहींनी प्राणांचे बलिदान दिले, त्या सर्वांच्या संघर्षाचा आज खऱ्या अर्थानं विजय झाला आहे, अशा शब्दांत नितेश राणे यांनी भावना व्यक्त केल्या आहेत.

महाराष्ट्रातील प्रस्तावित धर्मांतरविरोधी कायदा मध्य प्रदेश आणि गुजरातसारख्या राज्यांतील कायद्यांपेक्षा अधिक कठोर असेल, असा त्यांनी दावा केला. या कायद्याच्या सर्व तांत्रिक आणि कायदेशीर बाबींची सविस्तर माहिती लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

# धुलीवंदन सणात हुल्लडबाजांना पोलिसांचा दणका; अर्धापुरात २९ जणांवर कारवाई, २ लाखांचा दंड

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** धुलीवंदन आणि होळीच्या पार्श्वभूमीवर शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि वाहतुकीचे नियम पाळले जावेत, यासाठी अर्धापूर पोलिसांनी कडक पावले उचलली होती. धुलीवंदनानिमित्त लावण्यात आलेल्या विशेष नाकाबंदी दरम्यान नियम मोडणाऱ्या २९ वाहनधारकांवर कारवाई करत २ लाख ४ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवण्यात आली.

सणासुदीच्या काळात रस्त्यावर हुल्लडबाजी करणे, विनापरवाना वाहन चालवणे आणि ट्रिपल सीट प्रवास करणाऱ्यांविरुद्ध अर्धापूर पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली होती. यावेळी एकूण २९ जणांवर कारवाई करण्यात आली असून २ लाख ४ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. लायसन्स नसणे, ट्रिपल सीट प्रवास आणि सार्वजनिक ठिकाणी हुल्लडबाजी करणे अशांना या मोहिमेमुळे चांगली चपराक बसली. पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ. गजानन शिंदे, चंद्रकांत फुलकूंटवार आणि संतोष काळे, महेंद्र डांगे यांच्या पथकाने ही धडक कारवाई केली.



नाकाबंदी दरम्यान संशयास्पद वाहनांची तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना जागेवरच दंड ठोठावण्यात आला. सण शांततेत आणि नियमांचे पालन करून साजरे करावेत. नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासन सदैव तत्पर आहे, मात्र नियमांची पायमल्ली करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांनी दिला आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# शहरांतील वायू प्रदूषण मानवनिर्मित

आज परिस्थिती अशी आहे की, आपण विकास आणि पर्यावरण यांपैकी एकाची निवड करण्याच्या टप्प्यावर उभे आहोत. परंतु खरे तर ही निवड नाही; शाश्वत विकास हाच एकमेव मार्ग आहे. स्वच्छ हवा या संदर्भात बोलायचे झाल्यास हा नागरिकांचा मूलभूत हक्क आहे. तो केवळ महानगरांपुरता मर्यादित नसून, देशातील प्रत्येक गाव-शहराला तितकाच लागू आहे. वायू प्रदूषण ही केवळ महानगरांची समस्या आहे, हा समज आता पूर्णपणे खोटा ठरला आहे. धूर, धूळ आणि धोकादायक कणांनी भरलेली हवा ही फक्त दिल्ली-मुंबईपुरती मर्यादित नसून, देशातील लहान शहरांनाही तिचा विळखा बसू लागला आहे. काही ठिकाणी तर परिस्थिती महानगरांपेक्षा अधिक भयावह असल्याचे निष्कर्ष समोर येत आहेत. याला नांदेड शहर अपवाद नाही. ही केवळ पर्यावरणाची नव्हे, तर सार्वजनिक आरोग्याची आणि प्रशासनाच्या उत्तरदायित्वाचीही गंभीर कसोटी आहे. देशव्यापी अभ्यासातून उघड झालेले वास्तव धक्कादायक आहे. ईशान्य भारतातील बोंगाईगाव (आसाम-मेघालय सीमेवरील शहर) येथे पीएम २.५ च्या वार्षिक पातळीने काही काळ राजधानीलाही मागे टाकले होते. त्याच धर्तीवर गुरुग्राम, श्रीगंगानगर, फरीदाबाद, ग्रेटर नोएडा आणि मुझफ्फरनगर या शहरांचाही धोक्याच्या पातळीवरील प्रदूषण यादीत समावेश आहे. ही केवळ आकडेवारी नाही; ती आपल्या विकास मॉडेलवर उभे राहिलेले प्रश्नचिन्ह आहे. वायू प्रदूषणाच्या स्वरूपात हा आमूलाग्र बदल का झाला? लहान शहरांत झपाट्याने होणारे बांधकाम, औद्योगिक वाढ, वाढती वाहनसंख्या आणि पर्यावरणीय नियोजनाचा अभाव, या सगळ्यांचा एकत्रित परिणाम म्हणजे विषारी हवा. विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा बळी देण्याची पद्धत आता महानगरांपुरती मर्यादित राहिलेली नाही. परंतु, या संकटाशी दोन हात करताना आपण एक सोपा मार्ग अवलंबला आहे, तो म्हणजे जनतेला वास्तवाची पूर्ण कल्पना न देणे. देशातील बहुतांश भागांत हवेचे मोजमाप करण्यासाठी पुरेशी आणि सक्षम यंत्रणा नाही. परिणामी, नागरिकांना त्यांच्या परिसरातील हवेचा दर्जा किती खालावला आहे, याची माहितीच नसते. जागतिक स्तरावर एअर क्वालिटी इंडेक्स अर्थात वायु गुणवत्ता निर्देशक ही संकल्पना केवळ आकड्यांची नसून, ती आरोग्याशी निगडित सूचना देणारी प्रणाली आहे. प्रगत देशांमध्ये रेड अलर्ट घोषित करून शाळा बंद ठेवणे, वाहनांवर निर्बंध लादणे अशा तातडीच्या उपाययोजना केल्या जातात. आपल्याकडे मात्र अशा पूर्वसूचना यंत्रणेचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. सध्या देशात सुमारे ९६६ मॅन्युअल मॉनिटरिंग स्टेशन्स अर्थात मानव संचालित केंद्रे कार्यरत आहेत. ही केंद्रे नमुने गोळा करून प्रयोगशाळेत पाठवतात आणि २४ तासांनंतर सरासरी आकडेवारी देतात. तीही नियमितपणे उपलब्ध होईल याची खात्री नसते. बहुतांश केंद्रे वर्षातील किमान १०४ दिवसांचे निरीक्षणही पूर्ण करत नाहीत. देशात ४,००० हून अधिक शहरे आणि नगरे असताना ही व्यवस्था किती तोकडी आहे, हे सहज लक्षात येते. ४० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या अजूनही वायू प्रदूषण देखरेखीच्या कक्षेबाहेर आहे, तर सुमारे ६० टक्के लोकांना त्यांच्या परिसरातील ह्या निर्देशकाची कल्पनाच नसते. निश्चितच, या केंद्रांच्या उभारणीचा आणि देखभालीचा खर्च मोठा आहे. एक रिअल-टाईम स्टेशन उभारण्यासाठी सुमारे एक कोटी रुपये आणि वार्षिक देखभालीसाठी १८-२० लाख रुपये खर्च येतो. मात्र, हा खर्च आरोग्य व्यवस्थेवर येणाऱ्या भविष्यातील प्रचंड आर्थिक बोजापेक्षा कमीच आहे. श्वसनाचे आजार, हृदयरोग, लहान मुलांतील दमा आणि वृद्धांवरील परिणाम, या सर्वांची किंमत समाजाला मोजावी लागते. यावर उपाय काय? प्रथम, देखरेख यंत्रणा बळकट करणे अपरिहार्य आहे. तरुण स्टार्टअप्सना कमी खर्चातील सेन्सर तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांना वय गुणवत्ता निर्देशकाची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी देणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, रुग्णालये येथे डिजिटल डिस्प्ले बोर्डद्वारे हवेची गुणवत्ता जाहीर केली जावी. दुसरे म्हणजे, प्रतिबंधात्मक धोरणांमध्ये आमूलाग्र बदल हवा. लहान शहरांतील बांधकाम ांना पर्यावरणपूरक निकष बंधनकारक केले पाहिजेत. कमी धूळ निर्माण करणारी बांधकाम पद्धती, हरित पट्ट्यांची निर्मिती, नुतनीकरणक्षम ऊर्जेचा वापर. हे केवळ घोषणांपुरते न राहता प्रत्यक्षात उतरले पाहिजे. कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी ऊर्जा कार्यक्षम रचना आणि सौरऊर्जेचा प्रसार हा काळाचा आदेश आहे. तिसरा आणि अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सार्वजनिक वाहतूक. वाहनांची वाढ लोकसंख्येपेक्षा कितीतरी पटीने वेगाने होत आहे. कारण स्पष्ट आहे सार्वजनिक वाहतूक कमकुवत आहे. बससेवा अनेक शहरांत केवळ नावापुरती आहे. लोकांना नाईलाजाने दुचाकी आणि चारचाकी वाहनांकडे वळावे लागते. सार्वजनिक वाहतूक सक्षम केली, तर खाजगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होईल आणि प्रदूषणावरही आळा बसेल. वायू प्रदूषणाविरुद्धची लढाई केवळ सरकारची नाही, तर समाजाचीही आहे. माहिती, जागरूकता आणि कठोर अंमलबजावणी, या त्रिसूत्रीवर आपण भर दिला, तरच श्वास घेण्याचा हक्क सुरक्षित राहील. अन्यथा, विकासाच्या धुरातच आपले भविष्य हरवून जाईल.

# विनोद, आरोप-प्रत्यारोपाचे

एकविसाव्या शतकात किमान समज असलेल्या कुटुंबातील स्थिती पूर्ण बदलेली आहे. नवरोबाचा दरारा पूर्णपणे संपुष्टात आलाआहे.तो बिचारा गरीब प्राणी पूर्णपणे तडजोड स्विकारुन बिनदिक्कतपणे दिवस काढायला सिद्ध झाला आहे. वाटेल ती सेवा द्यायला त्याला कुठलाच संकोच वाटत नाही. अंहकार तर सोडा अभिमान,स्वाभिमान या शब्दांशी त्याचा काडीचाही संबध राहिला नाही.' जीना यंहा मरना यंहा इसके सिवा जाना कहां । ' ह्या मनोवृत्तीशी तो समरस झाल्यामुळे त्याचे जीवन किंचीतही वादग्रस्त राहीले नाही. तो सदैव ऐकूनच घेत असतो.त्यामुळे दररोज त्याच्यावर वेगवेगळ्या प्रकारचे आरोप केल्या जातात.त्या आरोपीच्या पिंजऱ्यात उभं राहणं हे त्याच्यासाठी नित्याचेचं झाले असल्यामुळे कधीकाळी तो जर मुक्त झालाचं तर त्याला गरगरुन येतं.ते मुक्तवातावरण त्याला खायला उठतं.मी या स्वातंत्र्याचं करु काय़? या प्रश्नाने त्याला भंडाऊन सोडलेलं असतं. शिवाय माणूस कोणत्याही परीस्थितीतं जुळवून घेतोचं. प्रश्न असतो तो प्रत्येक घरात सासूसुनांनी जुळवून घेतलं पहिजे. त्यांचा जरं त्रेसष्टचा आकडा असेलं तरं आपण सुखी. नाहीतर आपला वनवासं काही केल्या संपत नाही आणि तो काही एकदोन तपाचा असतं नाही.एकदा मागे लागला की पारं स्मशानभूमित पोहचेपर्यंत संपणार नाही.हे अगदी खात्रीपूर्वक मला सांगितलं पाहिजे. आज सकाळी सकाळी माझ्याकडं माझा परममित्र पक्या आल्यावर त्याची व्यथाअगदी या पल्लेदार वाक्यात,सदाशिव पेठी प्रमाण भाषेतआणि एका दमात सांगून झाल्यावरच त्यानं पॉज घेतला. त्याची सुपरफास्ट गितांजली सुरु झाल्यावर मधे बोलण्याचा प्रयत्न साक्षात पवनसूतांनीही



केला नसता,मग मधे बोलणारा मी कोण?

त्याच्या मनस्थितीचा विचार करुन मी क्षणभर स्तंभित झालो.या महादु:खी प्राण्याला कसा धिर द्यावा ? तेचं मला कळतं नव्हतं.जेंव्हा स्वातंत्र्याची कुटुंबप्रमुखाला भिती वाटू लागते.तेंव्हा तो कोणत्या मानसिकतेतून दैनंदिन प्रवास करतं असेलं यासंबधी अतिशय गंभीरपणे विचार केला पाहिजे.असं माझं मनं मला बजावू लागलं.पणं एखाद्या समस्येवर शांत राहून जी माणसं उत्तर शोधतं नाहीतं.मला जे वाटतं तेच वैश्विक सत्य आहे.असा घट्ट विचार( खरं तर अविचार)घेवून जगणारी माणसं भावनिक असतात. त्यामुळे त्यांचा मेंदू निष्क्रीय होण्याची शक्यता जास्त असते.त्याला निष्क्रीय ठेवून जगणाऱ्या माणसांना आत्मपरिक्षणचा विसरं पडतो. अशी विचारक्षमता माझ्यातही साठीनंतर आली.त्याविषयी पश्चाताप करण्याऐवजी साठी बुद्धी नाठी झाली नाही यात मी धन्यता मानतो.आपल्या मनासारखं काही झालं नाही म्हणजे चिडून जाणं,रडगाणं गाणं यापेक्षा जे झालं त्यातल्या काही सकारात्मक बाजू शोधून वैफल्या पासून दूर राहता आलं तरी जाता जाता थोडीफार अक्कलदाढ फुटली याचं समाधानं मिळवता येईलं.

मी डोकं शांत ठेवून असा विचार करु लागलो तेवढ्यात डोक्यात दणकन हातोडा मारावा तसा पक्या ओरडला. अरे काहीतरी बोलं,तू काहीतरी बोलावं म्हणून मी थांबलो तर तू अच-ानक असा मुका का झाला?पक्या त्याच्या दीर्घ संवादानंतर थांबला हे त्याचे उपकार न विसरण्यासारखे होते.त्याने गितां जलीचा टॉप गेअर टाकण्यापूर्वी मी काहीतरी बोलणं आवश्यक होतं.मी म्हणालो,तुझी काय ईच्छा आहे. चालं आपण ट्रेकिंगला जाऊ मी असा प्रस्ताव मांडल्याबरोबर पक्या जामं चिडला आणि म्हणाला, ज्याच्या आयुष्यात असे कायमचे चढउतार आहेत, त्याला ट्रेकिंगला जाण्याची काय गरज आहे रे?का विनाकारण माझ्या जखमेवर मिठ चोळतोस. पुढे मी म्हणालो, पक्या मग मी काय करावं अशी तुझी ईच्छा आहे. त्यावर पक्याचे उत्तर असे,आत्ता या घडीला तुझ्या बहीणीला फोन करुन इथं बोलावं. ( पक्याची अर्धांगीणी म्हणजे माझी मानसभगीनी ) आन् तिचे चांगले कानं उपटं.असे 'आ बैलं मुझे मारं ' उद्योग मला नेहमीच करावे लागतात.बरं रिकामे उद्योग करुन घरात वाद कोणं वाढवतो आणि डोक्याला ताप कोणाच्या?एकंदरीत एकूण सगळचं विचित्र.मला होणाऱ्या त्रासापेक्षा मैत्री महत्वाची होती,त्यामुळे मी पोटातले शब्द ओठावर न येवू देता म्हणालो. काही हरकत नाही आता फोनं लाव-तो. त्याप्रमाणं मी फोन लावला. काही वेळातचं माझी मानसभगीणी प्रतिभाताई माझ्या घरी हजर झाली. आमच्या सौ.ने तिचे यथोच्छित शाब्दिक स्वागत केले.

मी म्हणालो,ताई तुझ्या नावातच प्रतिभा असल्यामुळे आमच्या जावयाची प्रतिभाअशी भन्नाट फुलते की तीला असा गुलमोहरासारखा बहर येतो. आता आल्याबरोबर कौटुंबिक समस्यावर त्यानं लांब लचक भाषन दिलं. ते ऐकताचं मला चक्कर आली पण कसातरी सावरलो. आमच्या ताईचं शिक्षण म्हणजे जेमतेम ७ वी पास त्यामुळं बोलण्यावागण्या मधे गावराण रोखठोकपणा.आडपडदा किंवा काही तोलूनमापून शब्द टाकणे या शिष्टाचाराशी तिचा काहीही संबध नव्हता.त्यामुळं जे आहे ते रोखठोक. कोणाला काय वाटेल याचा विचार करण्यापेक्षा बोलून मोकळं व्हायचं.मन गुदमरु द्यायचं नाही.मन मारुन तर काहीचं करायचं नाही.

आमची प्रतिभाताई थांबल्यावर मी एक दीर्घ सुस्कारा टाकला.मनाशीचं म्हणालो,थांबली एकदाची,हे भाग्य आमचं.माझ्याही लक्षातं आलं बाई बोलते ते अगदी खरं आहे. एकदा का ही मशिनगनं सुरु झाली की पक्याची कायं चाळणं होतं असेलं. त्यामुळं त्याअगोदर या दहशतवादाला घाबरुन पक्या काश्मिर मधून किती वेळं महाराष्ट्रात पळाला असेलं (त्याच्या घरुन माझ्या घरी) मी शांतपणे म्हणालो. ताई किती बोलतेसं गं तू.करोनाच्या भंयकर महामारीतून वाचला बिचारा.अगं यमाशी फायटींग करुन परतं आला बिचारा.आन् तुला त्याचं काहीचं कौतुक नाही. जरा प्रेमानं वागं की त्याच्यासोबतं. त्यावरं तिचं उत्तर अगदी ऍक्शनवर रिऍक्शनप्रमाणे तयारच होतं. तीनं ताबडतोब उत्तर माझ्या तोंडावर फेकलं, बोलतोय कायं दादा. करोना चालू होतां आन् आमचे परकास राव मटन आन् दारुच्या लायनीतं उभे तासनंतासं.कसा नाही होणारं करोना ?आता मले सांग.कोणाले कोणता रोग अशीलं आपल्याले काही माहीतं असते का?मंग मी म्हणते कायले करावं असा इचकपणा.या बुवाले लयं आवडते ना... नको तथी तोंडखुपसेपणा.जथी नाही तथीसांक जाईलं आन् जेवं नाही तेवं रोगं घेऊन येईलं. जरासाकं धोरणानं सुदा राह्यला तं काही बिघडते का? बरं तथून आला की आंघुळ करायचा पत्ता नाही. म्या बोलायले गेली तं म्हणते,ज्याचं मनं साफं हायं त्याले आंघूळ करायची कायं गरज.हम्यातून एकदा केली तरी चालते ना.तुम तो आज न्हायेंगे तो कल न्हायेंगे .हम तो जूमे की जूमा...जूमे की जूमा. आत्ता याच्यापुढं कायं टकुरं..फोडून घेवू का?अशा प्रतिभासंपन्न शब्दात दम देवूनं प्रतिभाताई तरातरा निघून गेली.पक्याच्या चेहऱ्यावरची विवशता मला अस्वस्थ करुन गेली.तो काही बोलण्याअगोदर मी म्हणालो.

प्रकाशराव यानंतर निराशं न होता. आपलं कायं चुकतं ते पहा.आत्मपरिक्षण करुन स्वंय सुधारणा या मार्गाचा अवलंब करा.तुमच्यातीलं बदल जेंव्हा माझ्या बहिणीच्या लक्षात येईलं,तेंव्हा तिच्या वागणूकीत बदल होईलं.नाही झाला तर मलाही तुमची बाजू भक्कमपणे मांडता येईलं.पक्या खाली मानं घालून निमूटपणे काश्मिरची (त्याच्या घराची) वाटं चालू लागला.उभयतामधीलं सकारात्मक बदलाची प्रतीक्षा मी करू लागलो.

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# भारतातील धार्मिक व परंपरागत समाजसेवा

मानव जातीच्या समवेत समाजकार्य व समाजसेवा उदयास आली. भारत देशाचा विचार केल्यास प्राचीन व मध्ययुगीन काळात गरजूंना दान करणे, मदत करणे, सहकार्य करणे हे समाजकार्याचे प्रधान स्वरूप होते. सामान्य जनता व राज्यकर्ते या पद्धतीने समाजकार्य अविरत करीत होते. सम्राट अशोक, गुप्त काळ, वर्धन काळ, राजपूत, वाकाटक, मुघल वा पेशवा काळात शेती, पाणीपुरवठा, रस्तेबांधणी, दळण-वळण, मोफत औषधी, अंध-अपंगांना मदत इत्यादी विविध लोकोपयोगी कामे केली जात होती. पूर्वीपासूनच सधन व सुस्थितीतील लोकांकडून समाजा-तील गरजू, गरीब, वंचित व पीडितांना मदत केली जात असे. यास ते आपले कर्तव्य व जबाबदारी मानत होते. असे कल्याणाचे काम व अशी मदत हा धर्माचाही भाग होता. अशी मदत देणाऱ्या जातिसंस्था, कुटुंबव्यवस्था, गावसंस्था समाजात प्रामुख्याने होत्या. दानधर्म करणे हे पुण्याचे कार्य समजून समाजात 'दान' करण्याचे कार्य चालू असायचे. माणसाजवळ जे आहे त्यातील देवा-चा, ऋषींचा, ब्राम्हणांचा, समाजा-चा, बलुतेदारीचा, गरिबांचा वाटा काढून नंतर राहिलेला स्वतःसाठी उपयोग करावा असा धार्मिक व सामाजिक संकेत दिला जायचा. अशा रीतीने इतरांना मदत करणे हा दैनंदिन जीवनाचा व समाजऋण फेडण्याचा भाग होता. भारतात ही धार्मिक व पारंपरिक समाजसेवेचा वारसा टिकवून ठेवण्याचे आव्हान पुढील पिढीसाठी समानतेची बीजे रोवण्यास मदतगार होईल.

धर्म ही संकल्पना समजून घेत असतांना दानधर्म, माणुसकीचा धर्म या धर्माचा विचार करावा.समाजव्यवस्था टिकविण्यासाठी मदत, सहकार्य, सेवा गरजूंचे करणे अगत्याचे आहे.गावात, वाडी वस्तीवर वा शहरात वास्तव्य करतांना विशेष प्रसंग, सण, काही विशिष्ट दिवस मदत करण्यात समाज कृतकृत्यता मानतो. मानव मनाचा सखोल विचार करून परंपरा धर्मानी व समाजांनी निम ाण केल्या होत्या. समजा अशी बंधने, श्रद्धा, विश्वास, परस्पराप्रती उत्तरदायी भावना नसती तर मानवावे मानव-ाला मदत केली असती का? स्वतःसह इतरांच्या अस्तित्वासाठी, आनंद, मनः शांती व समाधान मिळविण्यासाठी अशी संस्कृती, संस्कार समाजाने व धर्माने मानवाला दिले आहेत. धर्मदायातून सम ाजाचे कल्याण तर साधलेच त्याचबरोबर एकेका व्यक्तीच्या गरजा पूर्णत्वास नेण्याचा सुकर मार्ग म्हणजे सेवा होय. मदत करण्याला 'परमार्थ' संबोधले गेले. घडलेल्या चुका निवारण्याने, प्रार्थनेसाठी, आराधनेसाठी, धर्मपालनासाठी, मनःशांतीसाठी इतरांची सेवा करण्याचे माध्यम ठेवले आहे.

पुरातन काळापासून मदत व्यक्तीगतरीत्या, सामूहिकरीत्या, मंदिरे धर्मस्थळे तसेच राजे, नवाब, जमीनदार, अधिकारी वर्ग यांच्याकडून केली जात होती. धर्मशाळा, देवालय उभारणे, रस्तेबांधणी, दिवाबत्तीची सोय, निराधार-विधवांना मदत, कलाकारांना आश्रय देणे, शिक्षणाची सोय करणे अशा प्रकारचे विविध स्वरूपात राज्यकर्त्यांकडून व अधिकाऱ्यांकडून सेवा केली जात होती. समाजावर कितीही आक्रमणे झालीत, नैसर्गिक आपत्ती आली वा राज्ये बदलली तरीही अनेक दानधर्म पाळणाऱ्या भारतीय समाजात समाजसेवा अखंडित सुरू राहिलेली आहे.सधन असलेल्या कुटुंबाने गरीब व अभावग्रस्त वर्गाला सेवा देऊन त्याचसोबत राहिलेला आहे त्यामुळे परस्परपूरक सहअस्तित्वाची जाणीव निर्माण झाली. एकमेकांच्या जवळ असणे, एकमेकांना मदत करणे हा भारतीय समाजाचा स्थायीभाव राहिला त्यामुळे भारतीय समाजात समाज-सेवा केव्हा अस्तित्वात आली अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित होण्याचा प्रश्न निर्माण होत नाही.

एकोणविसाव्या शतकात व त्या आधीही भारतीय समाजातील संतांनी समाजसेवेचा मार्ग समाजाला दिला आहे. समाजाची सेवा व प्रबोधन करण्याचा मोठा वाटा संतांनी, समाजसुधारकांनी उचलला आहे. गौतम बुद्ध, संत कबीर, मोहम्मद पैगंबर यांच्या शिकवणी व धर्मग्रंथामुळे समाजसेवेची पाळेमुळे खोलवर रुजली. संत रामदास, तुकाराम, एकनाथ, सावतामाळी, ज्ञानेश्वर, तुकडोजी महाराज, गाडगे महाराज या संतांनी समाजाचा, मानवी स्वभावाचा अभ्यास करून जीवनाचा मार्ग सांगितला.

समाजातील परिस्थिती बदलण्यात, समाजातील शोषित, पीडित, उपेक्षित घटकांची उन्नती करण्यात व जुन्या रूढी परंपरा जाळून टाकण्यात संत व समाज-सुधारक यांची मोलाची भूमिका आहे. समाजात गरीब-श्रीमंतातील विषमतेची दरी दूर करण्यासाठी प्राचीन काळापासून प्रयत्न चालू आहेत. समाजात दानशूर व्यक्ती कमी नसून सत्कर्म करणाऱ्या व्यक्ती वा संस्थात्मक समूहाला मदत करून हा प्राचीन वारसा आधुनिक काळात देखील निःस्वार्थ भावनेने चालू आहे. त्यामुळे समाज वा आपली धरती भेदाभेद दूर करण्यासाठी व सुजलाम-सुफलाम करण्यासाठी विसाव्या शतकातील सधन व्यक्ती-समूहाने वंचिताचा भार सोसून सामाजिक समतुल्य स्तरावर आणण्यासाठी कसोशीने प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे भारतातील धार्मिक व परंपरागत समाजसेवेचा धागा समाजसेवेने अधिक वृद्धिंगत होऊन भावना दृढ होतील हे मात्र नक्की.

**-दुशांत निमकर**
शब्दांकुर फाऊंडेशन, चंद्रपूर
मो. ९७६५५४८९४९

# ...हा दैवयोग आहे!

दिवसामागून दिवस निघून जा-तात. महिने-महिने करत वर्ष ही जाते. अनेक वर्ष होतात. माणसाच्या आयुष्यात, वेगवेगळ्या वळणावर, वेगवेगळी माणसे येतात आणि जातात. याच अनेक माणसांमध्ये काही माणसं हृदयाच्या तळापर्यंत पोहोचतात. काहीचा सह-वास हवाहवासा वाटायला लागतो. काही मात्र क्षणभराच्या सहवासासाठी ही नको वाटतात. अनेक माणसे, अनेक स्वभाव. 'मूर्ती तितक्या प्रवृत्ती.' प्रत्येकाच्या वेगवेगळ्या पद्धती, प्रत्येकाचे वेगवेगळे विचार. माणसं आणि त्यांचा स्वभाव आवडण्यासाठी किती क्षणाचा सहवास अपेक्षित असतो...? हे निश्चित सांगता येत नाही. कुणाचा क्षणभराचा सहवास ही सुखावून टाकतो. कायम स्मरणात राहतो.

हा स्नेह वंचना की,
काहीच आकळेना
आयुष्य ओघळोनी.
मी रिक्तहस्त आहे

कोण कोणासोबत किती काळ रा-हीले...? याला फारसं महत्त्व नसतं. तर त्याच्या असण्याने, त्याच्या वागण्याने-बोलण्याने माणसाच्या मनावर किती खा-लवर परिणाम झाला. हे महत्त्वाचं असतं. कोणताच माणूस चांगला किंवा वाईट नसतो. ती आपली संकल्पना असते. तो आपला दृष्टिकोन असतो. त्याच्या वागण्या-बोलण्याचे पडसाद असतात. सगळीच माणसं, सगळ्याच परिस्थितीत, सारखी वागत नाहीत. तसंच प्रत्येक माणूस प्रत्येकाशी सारखा वागत नाही. व्यक्ती-व्यक्तीनुसार, विविध घटकानुसार, त्याचं वागणं-बोलणं बदलत असतं. माणसाचा स्वभाव वस्तुनिष्ठ नसतो, तर व्यक्तिनिष्ठ असतो. म्हणूनच एकाच माणसाबद्दल प्रत्येकाची वेगवेगळी मते असू शकतात.

काटा रुते कुणाला,
आक्रंदतात कोणी
मज फूल ही रुतावे..
हा दैवयोग आहे

बारीक-सारीक प्रत्येक गोष्टींचा हिशोब आपण ठेवतो. ईश्वराने दिलेल्या 'अमूल्य भेटी'चा हिशोब आपण ठेवत नाही. खरंतर ईश्वराची 'अमुल्य भेट' म्हणजे आपलं 'जीवन'. ते वारेमाप पद्धतीने आपण उधळत असतो. 'टाईमपास' या नावाखाली वाट्टेल ते करतो. कधी विच-ारच करत नाही की, आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण किती महत्त्वाचा आहे. दिवसा दिवसांनी संपत जाणारी गोष्ट म्हणजे आयुष्य. प्रत्येकाचेच आयुष्य मर्यादित आहे. मर्यादित आयुष्यात जेवढं चांगलं वागता येईल, तेवढं वागलं पाहिजे. जेवढे भरभरून बोलता येईल, तेवढं बोललं पाहिजे. साधं-साधं, सोपं- सोपं, सरळं-सरळं, जीवन जगलं पाहिजे. विनाकारण गुंतागुंत वाढवायची नाही, जेवढे गुंते सोडवता येतील तेवढे सोडवायचे. काही समस्या सुटत नाहीत... तिथे विनाकारण वेळ वाया घालवायचा नाही. आयुष्यात अनेकांच्या स्मरणात राहू, असं जीवन जगायचं.

हसून पहावं, रडून पहावं.
जीवनाकडे माणसाने
डोळे भरून पाहावं...
काहीतरी द्यावं, काहीतरी घ्यावं
आपण गेल्यावर...
आपलं नाव कोणीतरी काढावं...

एवढं तरी चांगलं जीवन आपण नक्कीच जगायला पाहिजे. आपल्या अनुप-स्थितीत आपलं नाव काढल्याने कुणाच्या तरी चेहऱ्यावर हसू यावं. आपण गेल्यावर चार माणसांच्या तरी डोळ्यात पाणी यावं.. शेवटी औटघटकेचे राज्य आहे. कधीतरी जाणार.... म्हणून जमेल तेवढे चांगलं वागा.

माणसाला माणसाच्या आयुष्यात कशाची भुरळ पडेल. हे त्याचं त्यालाही माहीत नसतं. म्हणून तर माणसं वह-ावत जातात. तरीसुद्धा ते आपल्या भ्रमात असतात. प्रवाहासोबत वाहत असले, तरी माझ्यामुळेच हा प्रवाह आहे. हा भ्रम असतो. प्रवाह ओसरल्यावर कळतं, आपल्यामुळे प्रवाह नव्हता. आपण प्रवाहासोबत होतो. हे कळल्यावरही, माणसं जागी होतातच, असं नाही. पुन्हा दुसऱ्या प्रसंगातही ते तसेच वागताना दिसतात. हाच खरा 'मनुष्य स्वभाव' आहे. पुन्हा-पुन्हा चुका होऊ नयेत, म्हणून माणसाने घडणाऱ्या प्रत्येक प्रसंगाकडून, घटनेकडून काहीतरी शिकलं पाहिजे.

कोणती माणसं आपल्या आयुष्यात यावीत, येतील. किती दिवस एकमेकांचा सहवास लाभेल....? हे सगळं सुनिश्चित असतं. तेवढेच दिवस आपण एकमेकांच्या संपर्कात येतो. एकमेकांशी संवाद साधत-ो. विचारांची देवाण-घेवाण करतो. सुनियोजित दिवशी पुन्हा वेगवेगळ्या रस्त्याने प्रवास सुरू करतो. सोबत राह-तात, त्या फक्त आठवणी. त्या एकमेकांची शेवटपर्यंत सोबत करतात. ह्या आठवणी कुणी सांगतो, तर कुणी अजिबात सांगत नाही. याचा अर्थ असा नाही त्यांना काही आठवतच नाही. याउलट असंही असतं.... त्या आठवणींनी त्यांचे मन आजही विचलित होत असतं. म्हणून ते घाबरत असतात त्या आठवणींना... त्या आठवणीतल्या दिवसांना. अर्थात आठवणीसोबत असणाऱ्या त्या माणस-ाला...

खरं तर काहीच कारण नसेल, किंवा काही घडलेच नसेल, तर त्याविषयी बोलायला काय हरकत आहे. ज्याअर्थी आपण तो विषय, ती व्यक्ती टाळण्याचा प्रयत्न करतो.... त्याअर्थी त्या विषयाबद्दल, त्या व्यक्तीबद्दल आपल्या मनात अनेक प्रकारचे विचार असतात. अनेक प्रकारच्या भावना, संवेदना असतात. आजही त्यांना तेवढेच महत्त्व असतं. म्हणून आपण टाळत असतो त्या आठवणींना... आठवणीतल्या व्यक्तींना....

बऱ्याच वेळी बोलण्यामुळे होणाऱ्या जखमेपेक्षा, अबोल्याने झालेल्या जखमा अधिक त्रास देतात. एखाद्या माणसासोबत आपण बोलतो... यामागे जेवढे प्रेम, आपुलकी, माया, जिव्हाळा असतो त्याहीपेक्षा ज्या माणसासोबत आपण अबोला धरतो त्यामध्ये या सर्व भावनांचा जास्त समावेश असतो.

काही करु पहातो,
रुजतो अनर्थ तेथे
माझे अबोलणे ही..
विपरीत होत आहे

जसं विनाकारण आपण कुणाला भेटत नाही; तसं विनाकारण आपण कुणाला टाळतही नाही. भेटण्याला जेवढं महत्त्व असतं; त्याहीपेक्षा जास्त महत्त्व टाळण्याला असतं. या सगळ्या भावना आपल्याला अपराधीपणाची जाणीव करून देत असतात. आपल्या चुकांची, आपण केलेल्या अन्यायाची जाणीव करून देतात. समोरच्या निरागस माणसाला आपण कसं फसवलं....? याची आठवण देतात. पैसा, प्रतिष्ठा आणि व्यवहार यापेक्षा भावना फार महत्त्वाच्या असतात. ते आज कळत असतं. आपली 'मतलबी भूमिका' आज ध्यानात आलेली असते. खरंच आपल्या मनात काही नसेल तर आपण खूप मनमोकळेपणाने वागतो.

मनात खोलवर रुजलेल्या अशा जखमांवर कितीही पट्टी बांधली. अशा जखमा कितीही झाकल्या, तरी त्या वेदनाच देतात. जखम असणाऱ्यांना तो दाह कायमच राहतो. जखमेची ठसठस तशीच राहते. त्या आठवणींच्या जखमांवर फक्त आठवणीतलाच माणूस मलम लावू शकतो, फुंकर घालू शकतो. आपण कितीही सुखात असलो. तरी ते सुख त्या माणसाकडे अभिव्यक्त केल्याशिवाय अपूर्ण असतं. अशीच माणसाच्या आयुष्यात आलेली, आणि कायम घर करून गे-लेली माणसं... कितीही दूर असली, तरी ती आठवणीच्या रूपात आपल्या सोबत असतात. त्यांचे हे अमूर्त वास्तव्य आपण जपायचं. फक्त कुठल्याच आठवणींची 'जखम' होऊ द्यायची नाही..

सांगू कशी कुणाला?
कळ आतल्या जिवाची
चिरदाह वेदनेचा.
मज श्राप हाच आहे.

याउलट या आठवणींचं बळं निर्माण करायचं. आठवणींना आणि आठवणीतल्या माणसांना कायम स्मरणात ठेवायचं. मात्र एकमेकांच्या चुका विसरून जायचं. माणसं म्हटली की, चुका होणारचं. त्या चुकांना आज काहीच अर्थ नसतो. दो-घेही एकमेकांच्या जीवनात सुखी असतात. उगीच त्याच-त्याच गोष्टी उगाळत बसण्यात काहीच अर्थ नसतो. भरभरून बोलुन मन मोकळं करून टाकायचं. मनसोक्त हसायचं. कुणाचं कुणावर किती प्रेम होतं...? याला आज काहीच अर्थ नाही. आजच्या आयुष्यात आपण सुखी आहात का...? हेच महत्त्वाचं आहे. आठवणींना जपा..... आठवणी ताज्या करा.... आणि मनापा-सून म्हणा... अशी पाखरे येती... आणिक स्मृती ठेवुनी जाती... दोन दिसाची रंगत-संगत.... दोन दिसाची नाती....

**-मयूर मधुकरराव जोशी**
विठ्ठल रुक्मिणी नगर, जिंतूर.
जि. परभणी.
मो. ९७६७७३३५६०

# नांदेड तालुक्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' टप्पा क्र. १ ची अंमलबजावणी सुरू -सचिन खल्लाळ

**नांदेड (प्रतिनिधी)** –नागरिकांना महसूल, सामाजिक सुरक्षा योजना, मोजणी, इतर शासकीय सेवा अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान पद्धतीने उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालय नांदेडच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' टप्पा क्र. १ राबविण्यात येत आहे. मार्च ते मे २०२६ या कालावधीत तालुक्यातील विविध मंडळ स्तरावर शिबिरे आयोजित करून नागरिकांच्या दैनंदिन महसूलविषयक तक्रारी व प्रलंबित कामांचा तत्काळ निपटारा केला जाणार आहे.



या अभियानाअंतर्गत महसूल विभागासोबत ग्रामविकास विभाग, महिला व बालकल्याण विभाग, सामाजिक न्याय विभाग, पशुसंवर्धन विभाग, दुय्यम निबंधक कार्यालय तसेच पोलीस विभाग यांचा समन्वय साधून बहुविभागीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. 'सिंगल डे सर्व्हिस डिलिव्हरी' व 'सिंगल विंडो प्रणाली'चा अवलंब करून अर्ज स्वीकृती, पडताळणी व सेवा वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

**अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट**

लोकाभिमुख प्रशासनाची प्रभावी अंमलबजावणी, नागरिकांच्या महसूल–विषयक तक्रारींचे तत्काळ निराकरण, डिजिटल ७/१२, ८–अ उतारे व इतर सेवांचा जलद पुरवठा, एकाच ठिकाणी विविध शासकीय योजनांची माहिती व लाभ, शिबिरात उपलब्ध सेव

**महसूल दस्तऐवज :** प्रलंबित फेरफार निकाली काढणे, ७/१२ दुरुस्ती, डिजिटल ७/१२ व ८–अ उतारा वितरण, ई–मोजणी अर्ज, घरकुल प्रकरणे, अतिक्रमण विषयक कार्यवाही इत्यादी.

**प्रमाणपत्र सेवा :** उत्पन्न, रहिवासी, जात व नॉन–क्रीमी लेयर प्रमाणपत्रे.

**शेती व सामाजिक योजना :** पीएम किसान, संजय गांधी निराधार योजना, सामाजिक अर्थसहाय्य योजना आदींबाबत मार्गदर्शन व लाभ.

**इतर विभागीय सेवा :** ग्रामविकास विभागामार्फत ग्रामपंचायतविषयक प्रकरणे महिला व बालकल्याण विभागाच्या योजना. सामाजिक न्याय विभागाच्या शिष्यवृत्ती व अनुदान योजना.

दुय्यम निबंधक कार्यालयामार्फत नोंदणी संदर्भातील मार्गदर्शन, पोलीस विभागाकडून आवश्यक कागदपत्रांबाबत सहाय्य.

**मंडळनिहाय वेळापत्रक**

तालुक्यातील विविध मंडळांमध्ये खालीलप्रमाणे शिबिरे होणार आहेत.

७ मार्च २०२६ मंडळ तुप्पा, १४ मार्च २०२६ मंडळ लिंबगाव, १० एप्रिल २०२६ मंडळ विष्णुपुरी, १७ एप्रिल २०२६ मंडळ नाळेश्वर, २४ एप्रिल २०२६ मंडळ नांदेड ग्रामीण, ३० एप्रिल २०२६ मंडळ वाजेगाव, ८ मे २०२६ मंडळ तरोडा (बु.), १२ मे २०२६ मंडळ वसरणी, १५ मे २०२६ मंडळ नांदेड शहर.

अभियानाच्या पार्श्वभूमीवर संजय वारकड तहसीलदार नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली दि. २ मार्च रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीला ग्रामविकास विभाग, कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, भूमी अभिलेख विभाग, पाणीपुरवठा, महावितरण, पुरवठा विभाग तसेच पोलीस विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

सर्व प्रकरणे शिबिराच्या दिवशीच निकाली काढण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, प्रलंबित अर्जांची छाननी करून आवश्यक कागदपत्रांसह नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भोई प्रतिष्ठानचा 'रंग बरसे' रंगमहोत्सव उत्साहात; अर्धापुरातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांनी लुटला आनंद

**अर्धापूर (प्रतिनिधी)** –तालुक्यातील आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांनी भोई प्रतिष्ठानच्या वतीने पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या 'रंग बरसे' रंगोत्सवात सहभागी होऊन रंगाची मुक्तपणे उधळण करीत रंगपंचमी साजरी केली.



पुण्यातील भोई प्रतिष्ठानच्यावतीने दरवर्षी समाजातील वंचित घटक व विशेष मुलांसाठी रंग बरसे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या रंगोत्सवाचे हे ३१ वे वर्षे आहे. या रंगोत्सवात रंग बरसे भीगे चुनरवाली, खंडेरायाच्या लग्नाला, ब्राझील, सैराट अशा धमाल गाण्यांच्या तालावर पाण्याचे फवारे, नैसर्गिक व पर्यावरणपूरक रंगांची मुक्त उधळण आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांसोबत नृत्य करत विशेष मुले अक्षरशः रंगून गेली होती.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विशेष मुले, अंध मुले, मूकबधिर मुले, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुले, रेल्वे प्लॅटफॉर्मवर बुट पॉलिश करणारी मुले, डोंबारी खेळ करणारी मुले, देवदासी भगिनींची मुले तसेच ऊसतोड कामगारांची मुले अशा विविध घटकांतील सुमारे अडीच हजार बालमित्रांनी या महोत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रंगांची धमाल अनुभवली.

मुलांच्या स्वागतासाठी पर्यावरणपूरक नैसर्गिक रंग, पोलीस बँड, पिचकारी, नाष्टा व स्नेहभोजन असा संपूर्ण लवाजमा सज्ज होता. त्यांच्या आवडीच्या गाण्यांवर नृत्य करताना आणि पाण्याच्या फवाऱ्यांमध्ये नाचताना मुले हरखून गेली होती.

या रंगमहोत्सवात खा. डॉ. मेधा कुलकर्णी, महापौर मंजुषा नागपूरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्यासह विविध पक्षांचे नगरसेवक, लोकप्रतिनिधी आणि पोलीस अधिकारी उपस्थित होते. 'पुण्य जागर' प्रकल्पाचे समन्वयक लक्ष्मीकांत मुळे, गुणवंत वीरकर, दत्ता टोकलवाड, प्रवीण रावते, संदीप राऊत, आनंद मोरे आदींनी रंगोत्सवात सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे संयोजक व भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. डॉ. मिलिंद भोई यांनी प्रास्ताविकात सांगितले की, विशेष मुलांच्या आयुष्यात आनंद, उत्साह आणि मांगल्याचे रंग भरावेत, हा उपक्रम सातत्याने राबवला जात आहे अशा भावना व्यक्त केल्या.

या रंगोत्सवात नेक्स्ट जेन मूकबधिर मुलांची संस्था, ज्ञान गंगोत्री मतिमंद मुलांची संस्था, अस्तित्व गुरुकुल, समर्पण संस्था, एनेबलर फाउंडेशन, बचपन वर्ल्ड फोरम, वंचित विकास, वाघमोडे प्रतिष्ठान, अलका फाउंडेशन, अक्षर स्पर्श, जिजाऊ फाउंडेशन, कसबा संस्कार केंद्र, पर्वती दर्शन बालसंस्कार केंद्र, सूर्योदय सोशल फाउंडेशन, आयडेंटिटी फाउंडेशन, स्वाधार संस्था, श्री संत गजानन महाराज शिक्षण संस्था, अनिकेत सेवाभावी संस्था आदी संस्थांतील बालगोपाळांनी सहभाग घेत धुलीवंदनाचा आनंद लुटला.

# वाईट सवयींची आभासी होळी : सवना जि. प. शाळेत विद्यार्थ्यांचा चांगल्या सवयींचा संकल्प

**हिमायतनगर (प्रतिनिधी)** – तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सवना ज. येथे होळीच्या निमित्ताने वाईट सवयींची आभासी होळी हा उपक्रम उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात २ मार्च रोजी शाळेच्या प्रांगणात पार पडला. वाईट जाळू, चांगले उभारी देऊ या घोषवाक्याखाली आयोजित या उपक्रमाला विद्यार्थी व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी विद्यार्थ्यांनी खोटे बोलणे, आळस करणे, भांडण करणे, मत्सर, राग, शिस्त न पाळणे, अभ्यासाकडे दुर्लक्ष करणे, टिंगल–टवाळी करणे, स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणे, वेळ वाया घालवणे तसेच मोबाईल व टीव्हीचा अति वापर अशा विविध वाईट सवयींचा त्याग करण्याचा संकल्प केला.

सत्य बोलणे, वेळेचे पालन करणे, नियमित अभ्यास करणे, शिस्त पाळणे, मोठ्यांचा आदर करणे, स्वच्छता राखणे, मित्रांशी प्रेमाने वागणे व स्वतःवर विश्वास ठेवणे या चांगल्या सवयी अंगिकारण्याची प्रतिज्ञा विद्यार्थ्यांनी घेतली. विद्यार्थ्यांनी प्रतिकात्मक होळीसमोर आपल्या वाईट सवयी लिहून त्यांचे दहन केले व नव्या सकारात्मक जीवनशैलीचा स्वीकार करण्याचा निर्धार व्यक्त केला.

याशिवाय विद्यार्थ्यांनी पळसाच्या फुलांपासून शाळेतच नैसर्गिक रंग तयार करण्याचा उपक्रम राबवून पर्यावरणपूरक होळी साजरी करण्याचा संदेश दिला. स्वतः पळसाची फुले भिजवून त्यापासून रंग तयार करत नैसर्गिक साधनसंपत्तीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. तसेच रासायनिक रंगांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले. मुख्याध्यापक सतीश गोपतवाड, शिक्षक हावगिराव पाटील, मलोजी शिंदे, मनोहर शितळे, श्रीमती विजयश्रीताई भोसले, सौ. रेखाताई कदम आदी शिक्षक वृद्धांच्या नियोजनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांचा आढावा

**नांदेड (प्रतिनिधी)** –कै. शंकरराव चव्हाण नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांचा आढावा नुकताच घेण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, लातूरचे प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. नाना सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीस जिल्ह्यातील सर्व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक तसेच 'मैत्री' व नॅशनल डेअरी स्कीम अंतर्गत कार्यरत सेवादाते उपस्थित होते. नांदेड जिल्ह्यातील पशुप्रजनन कार्य, दुग्ध उत्पादन वाढ तसेच विदर्भ–मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प (टप्पा २) अंतर्गत बाबनिहाय आढावा घेण्यात आला. यासोबतच किसान क्रेडिट कार्ड योजना, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन कायदा आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

जिल्ह्यातील प्रजननक्षम गाय व म्हैस वर्गीय जनावरांसाठी वंध्यत्व निवारण शिबिरे आयोजित करून कृत्रिम रेतनाचे प्रमाण वाढविण्याचे निर्देश देण्यात आले. अधिक दुध उत्पादन देणारी जनावरे तसेच मादी कालवडींची निर्मिती करण्यासाठी लिंगवर्गीकृत रेतमात्राचा वापर वाढविण्याचे आवाहन करण्यात आले. दुग्ध उत्पादनवाढीसाठी विदर्भ–मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पांतर्गत कृती आराखडा तयार करून प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

पशुधनातील विविध लसीकरण मोहिमांचा आढावा घेण्यात आला. लाळ–खुरकूत लसीकरणाच्या आठव्या फेरीस सुरुवात करण्यात आली असून, विहित मुदतीत लसीकरण पूर्ण करून 'भारत पशुधन' प्रणालीवर माहिती अद्ययावत करण्याचे निर्देश देण्यात आले. लिंगवर्गीकृत रेतमात्रासाठी जिल्हा नियोजन समितीकडून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

नांदेड जिल्ह्यात कृत्रिम रेतनाचे कार्य दुप्पट करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या नियंत्रित प्रजनन कार्यक्रमाच्या प्रगतीचाही आढावा घेण्यात आला. तसेच प्रधानमंत्री धनधान्य योजनेअंतर्गत उद्दिष्टपूर्तीसाठी आवश्यक नियोजन व उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५–२६ अंतर्गत लिंगवर्गीकृत रेतमात्राचा पुरवठा करण्यात आला. या संदर्भात उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना डॉ. स्वप्नील देशमुख (एबीएस जीनस) यांनी सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन केले.

यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. सखाराम खुणे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार घुले, डॉ. अरविंद गायकवाड, नॅशनल डेअरी स्कीमचे प्रकल्प समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर सोनटक्के, विदर्भ–मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पाचे जिल्हा प्रकल्प अधिकारी डॉ. सतीश खिल्लारे तसेच विभागातील सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# नारायण बाचकलवाड यांना क्रीडारत्न नागरी पुरस्कार जाहीर

**बिलोली (प्रतिनिधी)** –नायगाव तालुक्यातील शेळगाव (गौरी) येथील क्रीडा शिक्षक नारायण मुकुंदराव बाचकलवाड यांची राज्यस्तरीय क्रीडारत्न नागरी पुरस्कार २०२६ साठी निवड झाली आहे. महात्मा ज्योतीराव फुले शिक्षक परिषदच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

कै. रामचंद्र पाटील माध्यमिक विद्यालय, शेळगाव (गौरी) येथे कार्यरत असलेले बाचकलवाड हे क्रीडा शिक्षक तसेच राज्यस्तरीय खो–खो पंच म्हणूनही कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना, शिस्त व मेहनतीचे संस्कार रुजवून त्यांनी अनेक खेळाडूंना जिल्हा व राज्य स्तरावर पोहोचविले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत पुरस्कार निवड समिती तसेच प्रदेश व जिल्हा पदाधिकाऱ्यांनी (जिल्हा लातूर) त्यांची निवड केली आहे. हा पुरस्कार वितरण समारंभ रविवार, दि. ८ मार्च २०२६ रोजी कै. दगडोजीराव देशमुख सभागृह, लातूर येथे संपन्न होणार आहे.

# गुरुनाथ पेंढारकर यांची ज्येष्ठ कलावंत मानधन समितीवर निवड



**नांदेड (प्रतिनिधी)** –छत्रपती राजश्री शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेच्या समितीवर नांदेड जिल्ह्यातील ज्येष्ठ कलावंत गुरुनाथ पेंढारकर यांची निवड झाली आहे. त्यांच्या निवडीचे पत्र जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे व जिल्हाधिकारी यांनी प्रदान केले आहे.

गुरुनाथ पेंढारकर हे गेले पाच दशकापासून लोककलेच्या माध्यमातून आपली सांस्कृतिक सेवा संपूर्ण महाराष्ट्रभर देत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन लोहा–कंधार मतदारसंघातील आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या शिफारशीवरून त्यांची नियुक्ती जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केली आहे. त्यांची निवड होताच मंत्रालयीन सांस्कृतिक शाखेच्यावतीने प्रभू सावंत यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या सत्कारास मंत्रालयीन सांस्कृतिक शाखेचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद गजभारे, जिल्हाध्यक्ष गंगाधर ओढणे, प्रा. अविनाश नाईक यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# सामाजिक न्याय विभागामार्फत विविध राज्यस्तरीय पुरस्कारांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय व वैशिष्ट्यपूर्ण कार्य करणाऱ्या व्यक्ती व स्वयंसेवी संस्थांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने सामाजिक न्याय विभागामार्फत विविध राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येतात. या पुरस्कारासाठी इच्छुक सामाजिक कार्यकर्ते व सेवाभावी संस्थांनी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यातील अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड कार्यालयाकडे १५ मार्च २०२६ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार, पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार, शाहू–फुले–आंबेडकर पारितोषिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्रावीण्य पुरस्कार आदी पुरस्कारांचा समावेश आहे.

सन २०२४–२५ व २०२५–२६ या आर्थिक वर्षांसाठी देण्यात येणाऱ्या वरील पुरस्कारांसाठी इच्छुक व्यक्ती व संस्थांकडून १५ मार्च २०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. संबंधित वर्षासाठी विहित अटींची पूर्तता करणे आवश्यक राहील. पुरस्कारासाठी पात्रतेचा कालावधी ०१ जानेवारी ते ३१ डिसेंबर असा विचारात घेण्यात येईल. सन २०२४–२५ या वर्षासाठी पात्रतेचा कालावधी ०१ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ असा राहील. सन २०२५–२६ या वर्षासाठी पात्रतेचा कालावधी ०१ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ असा राहील.

विहित नमुन्यातील अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, नांदेड येथे तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

# भाग्यनगर पोलिसांच्या कारवाईत तीन तलवार तर नांदेड ग्रामीणमध्ये एक खंजर जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत वेगवेगळ्या तीन घटनांमध्ये तीन तलवारी जप्त तर नांदेड ग्रामीण ठाण्याच्या हद्दीत एक खंजर जप्त करण्यात आला आहे.

भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत देगाव तालुका मुदखेड येथील आकाश रघुनाथ माचनवाड हा वर्कशॉप कॉर्नर येथे स्वतःजवळ तलवार घेऊन दहशत पसरत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांना मिळाली. त्यांनी त्या ठिकाणी आपल्या सहकारी कर्मचाऱ्यांना पाठवून आकाश माचनवार याला ताब्यात घेतले व त्याच्याकडून तलवार जप्त केली. पोलीस अंमलदार व्यंकट गंगुलवार यांच्या फिर्यादीवरून भाग्यनगर ठाण्यात त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार वसमतकर करत आहेत.

दुसऱ्या घटनेत गजानन महाराज कमानीसमोर बालाजी शिवाजी जाधव (वय २८) राहणार दया नगर तरोडा खुर्द, गौस बेग उर्फ शेरा रफिक बेग (वय ३०) रा. निजाम कॉलनी नांदेड हे एका दुचाकीवरून हातात तलवार फिरवत होते. पोलिसांनी त्यांनाही अटक करून त्यांच्याकडून तलवार जप्त केली. पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख यांच्या फिर्यादीवरून त्यांच्याविरुद्ध भारतीय हत्यार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार माळवे करत आहेत. तर तिसऱ्या घटनेत वैभव माधव पवार रा. लक्ष्मीनगर आणि माधव पवार हे दोघेजण टायनी एंजल शाळेजवळ लक्ष्मीनगर येथे विनापरवाना तलवार बाळगून दहशत पसरत होते. आरती राजकुमार बावणे यांच्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)** –राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त सकल धोबी समाजाच्यावतीने उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला समाजबांधवांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाची सुरुवात हभप स्वरा दीदी राजू देशमाने यांच्या ओजस्वी कीर्तनाने झाली. कीर्तनातून राष्ट्रसंतांच्या विचारांचा जागर करण्यात आला व समाजप्रबोधनाचा संदेश देण्यात आला.

यावेळी कष्ट साधना पुरस्कार देऊन डॉ. शिवराज गंगावळ यांच्या आई–वडिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या कष्ट, संस्कार आणि समाजाभिमुख कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. जयंतीनिमित्त दरवर्षी इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना कै. शिवाजीराव नागोराव इबितदार यांच्या स्मृतिप्रित्यर्थ पारितोषिक जाहीर करण्यात आले. तसेच नांदेड शहरात गाडगे महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालाजीराव ईबितदार होते. यावेळी ओबीसी भूषण सटवाजी माचनवार, नगरपरिषद संघटनेचे रामेश्वर वाघमारे, सुनील लोणवडे, माधव बळेगावकर, संघरत्न कांबळे, रामचंद्र येईलवाड, प्रा. अनिल मोरे, बजरंग तेलंग, अविनाश वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. योगेश अंबुलगेकर यांनी केले. प्रास्ताविक सचिन विभुते तर आभार अरविंद इबितवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तानाजीराव इबितदार, मुकुंद तेलंग, बालाजी कापसे, अरविंद इबितवार, सचिन विभुते, पिंटू मारवाडीकर, सचिन इबिते मांजरमकर, कैलास तेलंगे, अमर कोंडराज, गंगाधर जाधव, आकाश इबिते, दत्ता तेलंगे, शंकर रामतीर्थकर, गजानन विभुते, विजय तेलग, शंकर कापसे, रवी वाघमारे, मोहन नायके, गंगाप्रसाद पवार, बद्रीनाथ पवार, आकाश पवार, परमेश्वर तेलंग, गजानन इबितदार, दिलीप तेलंगे, संतोष इबितवर, पप्पू हर्नाळ, देविदास तेलंगवाड, बालाजी आकुलकर आदींनी अथक परिश्रम घेतले.

# नांदेड तालुक्यातील १६० विद्यार्थी एनएमएमएस परीक्षेत उत्तीर्ण

**नांदेड (प्रतिनिधी)**– तालुक्यातील विद्यार्थ्यांनी यंदाच्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या शिष्यवृत्ती (एनएमएमएस) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. गटशिक्षणाधिकारी सुधीर गुठे यांच्या प्रभावी नियोजन व सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे तालुक्यातील तब्बल १६० विद्यार्थी पात्र ठरले असून, शिक्षण क्षेत्रात समाधान व्यक्त होत आहे.

विद्यार्थ्यांचा सराव व्हावा म्हणून त्यांनी प्रत्येक केंद्रातून केंद्रस्तरावर जे विद्यार्थी या परीक्षेसाठी बसलेले आहेत अशा विद्यार्थ्यांची चाचणी घेऊन प्रत्येक केंद्रातून निवडक १० नावे तालुकास्तरावर मागवून घेतली आणि अशा ९० विद्यार्थ्यांची दर सोमवारी एक चाचणी याप्रमाणे जानेवारी महिन्यामध्ये प्रत्येक सोमवारी चाचणी घेऊन विद्यार्थ्यांचा सराव घेण्यात आला. सदर चाचणीसाठी ९० विद्यार्थ्यांना स्वनिर्मित प्रश्नपत्रिका तयार करून, मुख्य चाचणी होते त्याप्रमाणे उत्तरपत्रिकेची निर्मिती करून, चाचणी परीक्षा घेऊन त्याच दिवशी तपासण्यात आली. जे तीन विद्यार्थी टॉपचे मार्क घेऊन उत्तीर्ण झाले अशा तीन विद्यार्थ्यांना त्याच दिवशी बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांचे मनोगत घेऊन दुसऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. अशा सर्व विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त गुण घ्यावेत म्हणून प्रयत्न करण्यात आले. एनएमएमएस ही परीक्षा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेची व शैक्षणिक गुणवत्तेची कसोटी मानली जाते. या पार्श्वभूमीवर गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने सुरुवातीपासूनच नियोजनबद्ध तयारीवर भर दिला होता. तालुक्यात विविध शाळांमध्ये मार्गदर्शन वर्ग, सराव चाचण्या, प्रश्नपत्रिका विश्लेषण, शंका निरसन सत्रे तसेच गुणवंत विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात आले.



मुख्याध्यापक व विषय शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अतिरिक्त वेळ देऊन वैयक्तिक मार्गदर्शन केले. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनीही मोठ्या जिद्दीने तयारी करून यश मिळविले. पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची मेहनत यामुळे हा भक्कम निकाल लागल्याची भावना शिक्षकवर्गाने व्यक्त केली.

या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी सुधीर गुठे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच संबंधित मुख्याध्यापक, शिक्षक व पालक यांच्या संयुक्त प्रयत्नांचे कौतुक केले. भविष्यातही तालुक्याचा निकाल अधिक उंचावण्यासाठी अशाच प्रकारचे गुणवत्तावर्धन उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. नांदेड तालुक्याच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे जिल्ह्यात तालुक्याची शैक्षणिक प्रतिमा अधिक बळकट झाली असून सर्व स्तरांतून समाधान व्यक्त होत आहे.

# अंतर्मन

## पर्समध्ये ठेवा ही गोष्ट, आर्थिक समस्या दूर होतील...

**तुमच्या पाकिटात पैसे टिकत नाहीत का आणि तुम्ही कमाईपेक्षा जास्त खर्च करत आहात का? वास्तुशास्त्रात, ही बाब वास्तु दोषांशी जोडलेली आहे. लोक अनेकदा नकळत त्यांच्या पाकिटात अशा गोष्टी ठेवतात ज्यामुळे आर्थिक प्रगतीत अडथळा येतो आणि पैशाचा प्रवाह रोखला जातो. सर्वात सामान्य चूक म्हणजे फाटलेले किंवा घाणेरडे पाकीट वापरणे, ज्यामुळे शेवटी आर्थिक नुकसान होते. अशा परिस्थितीत, वास्तुशास्त्र आर्थिक समस्यांवर मात करण्यासाठी अनेक उपाय सुचवते. या उपायांचे पालन केल्याने आर्थिक अडचणी कमी होऊ शकतात आणि देवी लक्ष्मीचे आशीर्वाद मिळू शकतात...**



- या वस्तू तुमच्या पर्समध्ये ठेवू नका : बहुतेक लोक त्यांचे पर्स अनावश्यक वस्तूंनी भरलेले ठेवतात. जुनी बिले, पावत्या आणि फाटलेल्या नोटा पर्समध्ये ठेवणे मोठा दोष मानला जातो. फाटलेल्या पर्सचा वापर केल्याने आर्थिक नुकसान होते. म्हणून, जर तुमची पर्स थोडीशीही फाटली असेल तर ती ताबडतोब बदला.
- वास्तुमध्ये पर्सच्या रंगाचे महत्त्व : वास्तुनुसार, तुमच्या पर्सचा रंग तुमच्या आर्थिक परिस्थितीवर देखील परिणाम करू शकतो. काळा, निळा किंवा खूप गडद पर्स कधीकधी आर्थिक अडचणी निर्माण करू शकते. या रंगांच्या पर्स वापरणे टाळावे. त्याऐवजी, तुम्ही हिरवा, तपकिरी किंवा क्रीम रंगाची पर्स ठेवू शकता.
- पर्समध्ये देवतेचे चित्र शुभ आहे की अशुभ? : काही लोक त्यांच्या पर्समध्ये देवी लक्ष्मी आणि कुबेर यांचे चित्रदेखील ठेवतात. वास्तुशास्त्रानुसार, तुमच्या पर्समध्ये देवतेचे चित्र ठेवणे अशुभ मानले जाते. यामुळे आर्थिक समस्या उद्भवू शकतात. अशा परिस्थितीत, तुम्ही लाल रंगात कागदावर काढलेले सूर्य यंत्र ठेवू शकता. यामुळे तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल.
- पर्समध्ये मोरपंख ठेवण्याचे फायदे : वास्तु आणि ज्योतिषशास्त्रात, पर्समध्ये मोरपंख ठेवणे अत्यंत शुभ मानले जाते. असे केल्याने नकारात्मक ऊर्जा दूर होते आणि आर्थिक लाभाची शक्यता निर्माण होते. त्यामुळे राहू दोषदेखील कमी होतो. पर्समध्ये मोरपंख ठेवल्याने आर्थिक अडचणी दूर होतात आणि शुभेच्छा मिळतात.
- पाकिटातून पैसे बाहेर ठेवण्याचे मार्ग : तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत करण्यासाठी, पिवळ्या कापडात थोडेसे तांदळाचे दाणे आणि हळद बांधा. तुमच्या पर्समध्ये ही पोटली ठेवल्याने आर्थिक समस्या कमी होतील आणि पैसे येऊ लागतील.

# चैत्र नवरात्र कधी सुरू होते, 19 की 20 मार्च?

### घटस्थापनेची योग्य तारीख आणि शुभ वेळ जाणून घ्या...



**दुर्गा मातेला समर्पित चैत्र नवरात्र सुरू होण्यासाठी फक्त काही दिवस शिल्लक आहेत. दरवर्षी चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षातील प्रतिपदा तिथीला याची सुरुवात होते. हिंदू धर्मातील या सर्वात पवित्र सणाच्या पहिल्या दिवशी घटस्थापना केली जाते आणि पुढील नऊ दिवस, देवी शैलपुत्री, देवी ब्रह्मचारिणी, देवी चंद्रघंटा, देवी कुष्मांडा, देवी स्कंदमाता, देवी कात्यायनी, देवी कालरात्री, देवी महागौरी आणि देवी सिद्धिदात्री यांच्यासह देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाते. या वर्षी चैत्र नवरात्रेच्या तारखेबद्दल गोंधळ आहे. चैत्र नवरात्र कधी सुरू होईल आणि घटस्थापनेचा शुभ मुहूर्त कोणता आहे हे जाणून घेऊया...**

हिंदू कॅलेंडरनुसार, चैत्र नवरात्र चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षातील प्रतिपदा तिथीला सुरू होते. या वर्षी प्रतिपदा तिथी गुरुवार, १९ मार्च रोजी सकाळी ६ वाजून ५३ मिनिटांनी सुरू होईल आणि शुक्रवार, २० मार्च रोजी पहाटे ४ वाजून ५३ मिनिटांनी समाप्त होईल. प्रतिपदा तिथी १९ मार्च रोजी सूर्योदयानंतर सुरू होईल आणि दुसऱ्या दिवशी सूर्योदयाच्या आधी संपेल. त्यामुळे चैत्र नवरात्रीची सुरुवात १९ मार्चपासून होईल.

### देवी दुर्गा कोणत्या वाहनावर येईल?

**शशि सूर्ये गजारुढा शनि भौमे तुरंगमे। गुरौ शुक्रे च ढोलायां बुधे नौका प्रकीर्त्तिता।।**

या वेळी माता दुर्गा पालखीवर स्वार होऊन येईल. देवी भागवत पुराणातील एका श्लोकात म्हटले आहे की जर नवरात्र रविवार किंवा सोमवारी सुरू झाली तर माता दुर्गा हत्तीवर स्वार होऊन येते. जर शनिवार किंवा मंगळवारी पूजा केली तर माता दुर्गा घोड्यावर स्वार होऊन येते; गुरुवार किंवा शुक्रवारी पालखी. जर बुधवारी पूजा सुरू झाली तर माता दुर्गा नावेवर स्वार होऊन येते.

**गजे च जलदा देवी क्षत्र भंग तुरंगमे। नोकायां सर्वसिद्धि स्या ढोलायां मरणं धुवम्।।**

अन्य एका श्लोकानुसार, माता दुर्गेचे हत्तीवर स्वार होऊन आगमन केल्याने पूर आणि पाऊस वाढतो. जर माता घोड्यावर स्वार होऊन आली तर युद्ध होण्याची शक्यता असते. तथापि, जर माता देवी नावेवर आली तर इच्छा पूर्ण होतात. माता देवीचे पालखीवर आगमन शुभ किंवा फलदायी मानले जात नाही. जर माता पालखीवर आली तर रोग आणि मृत्यूची भीती असते.

### चैत्र नवरात्री कॅलेंडर


- नवरात्रीचा पहिला दिवस म्हणजे प्रतिपदा, माता शैलपुत्री पूजा आणि घटस्थापना : १९ मार्च, गुरुवार
- नवरात्रीचा दुसरा दिवस म्हणजे द्वितीया, माता ब्रह्मचारिणी पूजा : २० मार्च, शुक्रवार
- नवरात्रीचा तिसरा दिवस म्हणजे तृतीया, माता चंद्रघंटा पूजा : २१ मार्च, शनिवार
- नवरात्रीचा चौथा दिवस म्हणजे चतुर्थी, माता कुष्मांडा पूजा : २२ मार्च, रविवार
- नवरात्रीचा पाचवा दिवस म्हणजे पंचमी, माता स्कंदमाता पूजा : २३ मार्च, सोमवार
- नवरात्रीचा सहावा दिवस म्हणजे षष्ठी, माता कात्यायनी पूजा : २४ मार्च, मंगळवार
- नवरात्रीचा सातवा दिवस म्हणजे सप्तमी, माता कालरात्रीची पूजा : २५ मार्च, बुधवार
- नवरात्रीचा आठवा दिवस म्हणजे अष्टमी, माता महागौरी पूजन : २६ मार्च, गुरुवार.
- नवरात्रीचा नववा दिवस म्हणजे नवमी, माता सिद्धिदात्री पूजा, नवरात्र पारण : २७ मार्च, शुक्रवार

### घटस्थापनेसाठी शुभ मुहूर्त

घटस्थापनेसाठी दोन अत्यंत शुभ मुहूर्त आहेत. पहिला वेळ चौघडिया मुहूर्त आहे, जो सकाळी ६:५३ वाजता सुरू होतो आणि सकाळी ७:५६ पर्यंत चालतो. दुसरा वेळ दुपारी आहे. दुपारी १२:०५ ते १२:५३ पर्यंत, अभिजित मुहूर्त आहे, जो कलश स्थापनासाठी शुभ असतो. शिवाय, दुपारी १२:२६ ते १२:५३ पर्यंत, लाभ चौघडिया आहे, जो हा काळ सर्वात शुभ बनवतो.

# देवी लक्ष्मीचे वाहन असलेले घुबड मूर्खपणाचे प्रतीक का बनले?

### उल्लू शब्द अपमानास्पदपणे कसा वापरला जाऊ लागला?



**घुबडात अनेक गुण आहेत, तरीही मानव अजूनही या पक्ष्याचे नाव म्हणजेच उल्लू मूर्खपणाचा शब्द म्हणून वापरतात. यामागील कारण जाणून तुम्हाला आश्चर्य वाटेल. या संदर्भात, एक कथा सांगितली जाते, जी मानवांना घुबडांबद्दल असलेल्या वैराचे स्पष्टीकरण देते. म्हणूनच इतर पक्ष्यांच्या तुलनेत त्यांचा अपमानजनक शब्द म्हणून वापर केला जातो.**

असे म्हटले जाते की एकदा एका गडद अमावस्येच्या रात्री हंसांची जोडी घरी परतत होती. हंसाने एका झाडाजवळ अनेक घुबड उडताना पाहिले. तो हंसिणीला म्हणाला, आजची रात्र इथे थांबूया, पण लक्षात ठेव. घुबड हा पक्ष्यांपैकी सर्वात वाईट पक्षी आहे. काही घुबडांनी हे ऐकले आणि त्यांना घेरले. हंस आणि हंसिणी निघून जाऊ लागले, तेव्हा एका घुबडाने म्हटले, ही हंसिणी आमची पत्नी आहे. तुम्ही तिला कुठे घेऊन जात आहात? हे ऐकून हंस स्तब्ध झाला. हंसांनी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न



केला, परंतु घुबड स्थिर राहिले. शेवटी, हंस म्हणाला की मानव बुद्धिमान आहे, सर्व प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ आहे, म्हणून हा वाद मानवांनीच ठरवावा आणि मानव जो काही निर्णय घेईल तो मान्य केला जाईल. जवळच्या मानवी वस्तीतील एका पुरुषाला न्यायनिवाडा करण्यासाठी आणण्यात आले. त्या पुरुषाने दोन्ही बाजू ऐकल्या आणि नंतर निर्णय दिला की हंस खरोखरच घुबडाची पत्नी आहे आणि हंसाने तिला सोडून द्यावे. घुबडांनी हंस आणि हंसिणीला वेढले असल्याने, हंस आता आपल्या निर्णयावर माघार घेऊ शकत नव्हता.

हंसाची अवस्था पाहून एक म्हातारा घुबड म्हणाला, की तुला मानवांच्या निर्णयावर खूप विश्वास होता. आम्ही घुबड असू शकतो, पण आम्ही मानवांना चांगले ओळखतो. ते स्वार्थी आणि कृतघ्न आहेत. तू ठरलास परदेशी. तुमच्या बाजूने निर्णय दिल्याने त्याचा काय फायदा होईल, हे आम्हाला प्रत्यक्ष माहीत होते. म्हणूनच तू हरलास. घुबडाच्या शब्दांचे हंसाकडे उत्तर नव्हते. म्हाताऱ्या घुबडाच्या शब्दांबद्दल मानवांना कळल्यानंतर घुबड हा शब्द असभ्य भाषेसाठी वापरला जाऊ लागला. हे कथानक एखाद्या व्यंगचित्रकाराची कल्पनाशक्ती असली तरी, ते घुबड आणि मानवजात यांच्यातील वैरभावाकडे नक्कीच संकेत देते.

# पूजा कक्षात का नसावेत पूर्वजांचे फोटो...

### फोटो लावण्याची योग्य दिशा जाणून घ्या...

**देवघर असलेल्या खोलीत पूर्वजांचे फोटो नाही तर फक्त देवतांचीच चित्रे ठेवावीत. पूर्वजांचे फोटो लावल्याने नकारात्मक ऊर्जा प्रसारित होते. ज्यामुळे मानसिक अशांतता आणि वास्तुदोष निर्माण होतात. पूजा कक्ष हे पवित्र आध्यात्मिक उर्जेचे केंद्र आहे, जिथे फक्त देवदेवता, यंत्रे आणि पवित्र चिन्हे ठेवली जातात. येथील वातावरण अत्यंत शांत, शुद्ध आणि दिव्य असले पाहिजे. पूर्वजांचे किंवा दिवंगतांचे फोटो किंवा आठवणी भूतकाळाशी संबंधित आहेत.**

पूर्वजांचे फोटो पाहून लोक सहसा असा विलाप करतात की जर ते आजही आपल्यामध्ये असते तर किती छान झाले असते. यामुळे पूजा कक्षात पूर्वजांचे फोटो ठेवल्याने शांत आणि अस्वस्थ अशा परस्परविरोधी शक्तींचा संघर्ष निर्माण होतो, ज्यामुळे मानसिक अशांतता, उपासनेत व्यत्यय आणि वास्तुदोष निर्माण होतात. पूजा कक्षात दिवंगतांचे चित्र देवतेकडे तोंड करून ठेवणे टाळा. पूर्वजांचे फोटो नेहमी तुमच्या घराच्या नैऋत्य कोपऱ्यात लावावेत. श्राद्ध आणि पुण्यतिथीच्या दिवशी पूर्वजांची पूजा विहित विधीनुसार करावी. पूर्वज हे आपल्या आदर आणि श्रद्धेचे प्रतीक आहेत, परंतु ते देवतेची जागा घेऊ शकत नाहीत. पूर्वज पूजेला पात्र आहेत, परंतु त्यांना देवाच्या जागी ठेवता येत नाही.


### हे मुद्दे लक्षात ठेवा...

जो व्यक्ती स्वतःच्या चित्राची पूजा करतो तो लवकर विनाशात जातो. म्हणून, स्वतःच्या चित्राला हार घालणे टाळावे. बेडरूममध्ये कधीही पूजास्थळ बांधू नये. बेडरूममध्ये देव-देवतांचे फोटो ठेवणे अशुभ मानले जाते. घराच्या कोणत्याही खोलीत रडणाऱ्या व्यक्तीचे फोटो, युद्धाचे चित्र, मावळत्या सूर्याचे किंवा बुडणाऱ्या जहाजाचे दृश्य, साचलेल्या पाण्याचे दृश्य किंवा क्रूर प्राणी आणि पक्ष्यांचे



फोटो लावू नका. कारण यामुळे निराशा आणि एकटेपणा येतो. घरात सर्वत्र पूर्वजांचे फोटो, देव-देवतांचे फोटो, मूर्ती किंवा कॅलेंडर लावू नयेत. घरात भिकारी, वृद्ध किंवा रडणाऱ्या मुलांचे फोटो किंवा पोस्टर लावू नका. हे गरिबी, आजार किंवा दुःखाची छाप देतात. त्यांच्या जागी समृद्धी, आनंद, समृद्धी आणि विकास इत्यादी दर्शविणारी चित्रे लावावीत.

# पुरुषांपेक्षा महिला चार पट बुद्धीमान, सहापट धैर्यवान आर्य चाणक्य यांनी सांगितले महिलांचे गुण



**आचार्य चाणक्य केवळ एक महान राजकारणी नव्हते तर एक महान रणनीतीकार देखील होते. त्यांच्या धोरणांचे पालन करून, एखादी व्यक्ती सर्वात कठीण आव्हानांना देखील सहजपणे तोंड देऊ शकते. चाणक्य नीतिमध्ये, आचार्य काही पैलूंमध्ये महिलांची तुलना पुरुषांशी करतात. या श्लोकात, आचार्य महिलांचे अनेक गुण अधोरेखित करतात. ते अशा गोष्टींचा उल्लेख करतात जे लोकांना माहीत नाहीत.**

स्त्रीणां द्विगुण आहारो बुद्धिस्तासां चतुर्गुणा।
साहसं षड्गुणं चैव कामोऽष्टगुण उच्यते ।।

चाणक्य नीतिच्या पहिल्या अध्यायाच्या १७ व्या श्लोकात म्हटले आहे की महिलांचा आहार पुरुषांपेक्षा दुप्पट आहे, त्यांची बुद्धिमत्ता पुरुषांपेक्षा चार पट आहे, त्यांच्याकडे पुरुषांपेक्षा सहा पट जास्त धैर्य आहे आणि त्यांची लैंगिक इच्छा पुरुषांपेक्षा आठ पट आहे.

- पुरुषांपेक्षा दुप्पट अन्न : चाणक्य यांच्या मते, महिलांना पुरुषांपेक्षा जास्त अन्नाची आवश्यकता असते. महिलांना पुरुषांपेक्षा जास्त शारीरिक काम करावे लागते. पूर्वीच्या काळात, महिलांना अनेक लहान घरगुती कामे करावी लागत होती, ज्यात खूप ऊर्जा खर्च होत होती. आजही परिस्थिती मोठ्या प्रमाणात तशीच आहे. शिवाय, महिलांना त्यांच्या शारीरिक रचनेमुळे, त्यांच्या शरीरातील बदलांमुळे आणि पुनरुत्पादक कार्यांमुळे गमावलेली ऊर्जा भरून काढण्यासाठी अतिरिक्त पौष्टिक अन्नाची आवश्यकता असते.
- चार पट जास्त बुद्धिमत्ता : आचार्य म्हणतात की महिलांमध्ये पुरुषांपेक्षा चार पट जास्त बुद्धिमत्ता असते. त्यांच्या मते, समस्या सोडवण्याद्वारे बुद्धिमत्ता विकसित होते आणि महिलांना दररोज असंख्य कौटुंबिक बाबी हाताळाव्या लागतात. यामुळे त्यांची बुद्धी तीक्ष्ण होते आणि अगदी लहानात लहान तपशील देखील समजून घेण्याची त्यांची क्षमता विकसित होते.
- पुरुषांपेक्षा सहापट जास्त धैर्य : स्त्रियांमध्ये पुरुषांपेक्षा सहापट जास्त धैर्य असणे देखील स्वाभाविक आहे. असेही आढळून आले आहे की मादी प्राणी आणि पक्षी त्यांच्या संततीचे रक्षण करण्यासाठी स्वतःपेक्षा अनेक पटीने बलवान असलेल्यांविरुद्ध मृत्यूपर्यंत लढण्यास तयार असतात.



# २०२४-२५ मध्ये भाजपचे उत्पन्न ६७६९.१४ कोटी

## ६ राष्ट्रीय पक्षांच्या उत्पन्नाच्या ८५%; काँग्रेसच्या उत्पन्नापेक्षा ७ पट जास्त

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सने आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी राष्ट्रीय पक्षांचे उत्पन्न जाहीर केले. अहवालानुसार, भाजपचे एकूण उत्पन्न रू. ६,७६९.१५ कोटी आहे. ६ राष्ट्रीय पक्षांच्या उत्पन्नापैकी ८५% हिस्सा एकट्या भाजपजवळ आहे. भाजपचे उत्पन्न मागील वर्षाच्या तुलनेत ५५.९५% जास्त आहे आणि काँग्रेसपेक्षा सुमारे ७ पट अधिक आहे.

देशातील ६ प्रमुख राष्ट्रीय पक्ष – भाजप, काँग्रेस, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, आम आदमी पक्ष, बहुजन समाज पक्ष आणि नॅशनल पीपल्स पार्टी यांचे एकूण उत्पन्न ७,९६० कोटी रुपये नोंदवले गेले. तर, मागील वर्षाच्या तुलनेत राष्ट्रीय पक्षांच्या एकूण उत्पन्नात ४१.३५% वाढ झाली आहे. तर, काँग्रेसचे उत्पन्न २०२३-२४ मध्ये रू. १,२३०.७३ कोटी होते, जे २०२४-२५ मध्ये घटून रू. ९१८.२९ कोटी झाले. हे मागील वर्षापेक्षा सुमारे २५.३९% कमी आहे. आपच्या उत्पन्नात ७३.२०% वाढ झाली आहे, तर बसपा आणि सीपीआय-एम च्या उत्पन्नात फारसा फरक नाही.

अहवालानुसार, राजकीय पक्षांना मिळणाऱ्या पैशाचा मुख्य स्रोत देणग्या आहेत. राष्ट्रीय पक्षांच्या एकूण उत्पन्नापैकी ८५% पेक्षा जास्त म्हणजे सुमारे रू. ६,७७२.५३ कोटी, लोक आणि संस्थांकडून मिळालेल्या ऐच्छिक देणग्यांमधून आले. यामध्ये भारतीय जनता पक्षाने आपल्या एकूण उत्पन्नाचा सुमारे ९०.४८% हिस्सा देणग्यांमधून जमा केला.

दुसरीकडे, काँग्रेसने देणग्यांव्यतिरिक्त कूपन विकूनही चांगली कमाई केली, ज्यामुळे पक्षाला सुमारे रू. ३५०.०५ कोटी मिळाले. तर, बसपाने आपल्या अहवालात देणग्यांमधून कोणतेही उत्पन्न दाखवले नाही. पक्षाची संपूर्ण कमाई बँक व्याज आणि इतर गुंतवणुकीतून झाल्याचे म्हटले आहे. पैसे खर्च करण्याच्या बाबतीतही पक्षांमध्ये मोठा फरक दिसतो. सहा राष्ट्रीय पक्षांनी मिळून एकूण रू. ४,७१०.२७ कोटी खर्च केले. यापैकी भारतीय जनता पक्षाने निवडणूक प्रचार आणि प्रशासकीय कामांवर रू. ३,३३५.३७ कोटी खर्च केले, जे त्याच्या एकूण उत्पन्नाच्या अर्धेही नाही.

तर, काँग्रेसचे उत्पन्न छ९१८.२९ कोटी होते, परंतु पक्षाने एकूण रू. १,१११.९५ कोटी खर्च केले. म्हणजेच काँग्रेसने आपल्या उत्पन्नापेक्षा सुमारे रू. १९३.६६ कोटी जास्त खर्च केले. उझख-च् ने देखील आपल्या उत्पन्नाच्या सुमारे ८४% खर्च केले. दुसरीकडे, भाजप आणि बसपाने आपल्या उत्पन्नाचा मोठा भाग भविष्यासाठी वाचवून ठेवला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान अभियान टप्पा क्र.१ प्रभावी राबविण्यासाठी विभागीय आयुक्तांचा सरपंचांशी संवाद



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान अभियान टप्पा क्र. १ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दि. ४ मार्च रोजी विभागातील पाच जिल्हे तसेच दि. ५ मार्च रोजी विभागातील उर्वरित तीन जिल्ह्यांतील सरपंचांशी ऑनलाईन माध्यमातून ग्रामसंवाद साधला. या संवादामध्ये महसूल विभागाशी संबंधित विविध प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेण्यात आला.

गावपातळीवरील नागरिकांना भेडसावणाऱ्या महसूल विषयक अडचणी जसे की वारस नोंद, नाव दुरुस्ती, जमीन अभिलेखाशी संबंधित बाबी, ७/१२ उतारा दुरुस्ती, नकाशे तसेच इतर महसूल विषयक प्रकरणे अभियानाच्या माध्यमातून जलदगतीने निकाली काढण्यावर भर देण्यात येणार असल्याचे यावेळी आयुक्त पापळकर म्हणाले. विभागीय आयुक्तांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून शिबिर नियोजनाबाबत आढावा घेतला. या संवादामध्ये प्रत्येक जिल्ह्यातील सरपंचांना बोलण्याची संधी देण्यात आली. काही सरपंचांनी गावपातळीवरील अडचणी मांडल्या, तर काहींनी अभियानाच्या नियोजनाबाबत माहिती दिली. तसेच हे अभियान उपयुक्त असून याचा फायदा गावातील सर्व नागरिकांना होईल, असे मतही अनेक सरपंचांनी व्यक्त केले. गावपातळीवरील सर्व यंत्रणांनी आपापसातील भेदभाव व मतभेद बाजूला ठेवून एकत्रितपणे काम करावे, असे आवाहनही विभागीय आयुक्त पापळकर यांनी केले. सरपंचांनी आपल्या गावातील सार्वजनिक तसेच वैयक्तिक प्रलंबित कामांची यादी तयार करून शिबिराच्या दिवशी प्रशासनाकडे सादर करावी, असेही त्यांनी सांगितले. शिबिरात प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर कायदेशीर बाबी तपासून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, असेही विभागीय आयुक्त पापळकर यांनी स्पष्ट केले.

अभियान नागरिकाभिमुख असून महसूल प्रशासन गावपातळीवर नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध आहे. त्यामुळे सरपंचांनी गावातील महसूल विषयक प्रलंबित प्रकरणांची माहिती प्रशासनापर्यंत पोहोचवून नागरिकांना या अभियानाचा लाभ मिळवून देण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन विभागीय आयुक्त पापळकर यांनी केले. शिबिरात प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जास पोहोचपावती देण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांनी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार यांना दिले आहेत. या शिबिरामध्ये इतर विभागांचाही समावेश असल्याने संबंधित विभागांशी निगडीत प्रलंबित कामांबाबतचे अर्जही नागरिकांनी सादर करावेत, असेही यावेळी सरपंचांना सांगण्यात आले.

संवादादरम्यान लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने अभियानांतर्गत अर्ज सादर करण्यासाठी ठठ कोड तयार केल्याची माहिती दिली. या कोडच्या माध्यमातून अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. तसेच नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाने सर्व सरपंचांसाठी एक व्हॉट्सॲप क्रमांक उपलब्ध करून दिला असून त्यावर गावातील प्रलंबित कामांची यादी पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना देण्यात येणारे विविध दाखले व प्रमाणपत्रे शाळांमध्येच उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करावे, असे निर्देशही विभागीय आयुक्तांनी दिले. या शिबिरामध्ये एकल महिला पुनर्वसन व विकास कार्यक्रम हा नाविन्यपूर्ण उपक्रमही राबविण्यात येणार आहे. सरपंचांनी गावातील एकल महिलांच्या प्रलंबित कामांचा आढावा घेऊन त्यामध्ये सातबारा संबंधित बाबी, रेशनकार्ड, संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी योजना तसेच इतर योजनांशी संबंधित कामे शिबिरांतर्गत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश विभागीय आयुक्त पापळकर यांनी दिले. प्रत्येक गावात शिबिर होणाऱ्या तारखेबाबत भिंतींवर माहिती रंगवून प्रसिद्धी करावी, जेणेकरून सर्व नागरिकांना शिबिराची माहिती मिळेल आणि अधिकाधिक नागरिकांना या सेवांचा लाभ घेता येईल, असेही विभागीय आयुक्त म्हणाले.

मतदानाच्या प्रचाराप्रमाणेच सरपंचांनी गावातील प्रत्येक घरी भेट देऊन नागरिकांच्या समस्या जाणून घ्याव्यात आणि त्याबाबत अर्ज सादर करण्यासाठी प्रोत्साहित करावे, असेही ते म्हणाले. ग्रामपंचायत स्तरावर या अभियानाची व्यापक प्रसिद्धी करून जास्तीत जास्त नागरिकांना लाभ मिळवून देण्यासाठी सरपंच व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही विभागीय आयुक्तांनी केले. या ग्रामसंवादात विभागातील सर्व जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी तसेच विभागातील सरपंच मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# दर्शनाहून परतताना पाण्याचा मोह आवरला नाही; दोन मित्रांचा मृत्यू

**फुलंब्री (प्रतिनिधी)** – खाटूश्याम बाबांचे दर्शन घेऊन परतताना पोहण्यासाठी तलावात उतरलेल्या दोघांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील कोलठाण शिवारात मंगळवारी दुपारी घडली.

सचिन गजानन वराडे (२१) आणि समर्थ बाबासाहेब चितळे (१६) अशी मृतांची नावे असून दोघेही चिकलठाणा येथील सावित्रीनगर परिसरातील रहिवासी होते.मंगळवारी सकाळी आठ मित्र दुचाकीवरून संभाजीनगर तालुक्यातील खाटूश्याम मंदिरात दर्शनासाठी गेले होते. सचिन वराडे हा आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. तो गॅरेजवर काम करत होता. वडील ट्रॅक्टरचालक आहेत. कुटुंबात आई-वडील व एक बहीण असा परिवार आहे. कष्टाने संसार उभा करणाऱ्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## वाहतूकदारांचा राज्यव्यापी संप मागे

**मुंबई (प्रतिनिधी)** – अन्यायकारक इ-चलान रद्द करण्याबाबत शासन सकारात्मक भूमिका घेणार असल्याचे आश्वासन देत तसेच वाहतूकदारांच्या विविध समस्यांवर तोडगा काढण्यासाठी लवकरच पोलीस व परिवहन विभागाची संयुक्त बैठक बोलावण्यात येणार असल्याची माहिती दिल्यानंतर राज्यातील विविध वाहतूकदार संघटनांनी पुकारलेला राज्यव्यापी संप मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, राज्य व्यापी वाहतूकदारांच्या संपा संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली . तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुरदृष्य प्रणालीद्वारे वाहतूकदार संघटनांची शिखर समिती 'महाराष्ट्र ट्रान्सपोर्ट ॲक्शन' कमिटीच्या सदस्यांशी संवाद साधला. त्यांच्या मागण्यांचा सहानुभूतीने शासन विचार करित आहे, तरी संप मागे घ्यावा असे आवाहन केले. त्या आव्हानाला प्रतिसाद देत वाहतूकदारांनी संप मागे घेतला आहे. तसेच , शासन वाहतुकदारांच्या विविध मागण्या संदर्भात संवेदनशील असल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले . अन्यायकारक पद्धतीने काढण्यात आलेल्या इ-चलानांबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल तसेच संबंधित समस्यांवर चर्चा करण्यासाठी परिवहन विभाग व पोलीस प्रशासन आणि वाहतूकदार संघटनांचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

# शिष्यवृत्ती परीक्षेकरिता नोंदणी आणि आवेदनपत्र भरण्यासाठी ६ मार्च पर्यंत मुदतवाढ

मुंबई, दि. ५ – महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.४ थी) व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.७ वी) २६ एप्रिल, २०२६ रोजी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेकरिता शाळा नोंदणी व विद्यार्थी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरिता नियमित शुल्कासह ६ मार्च, २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत असल्याचे परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ.नंदकुमार बेडसे यांनी कळविले आहे.

या परीक्षेकरिता शाळा नोंदणी व विद्यार्थी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरीता ३० डिसेंबर २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मुदत देण्यात आलेली होती. तथापि शाळा नोंदणी व विद्यार्थी आवेदनपत्र / शुल्क भरणा करण्याकरीता वाढीव मुदत मिळण्यासाठी परीक्षा परिषदेस अनेक शाळांकडून विनंती प्राप्त झाली आहे. या अनुषंगाने अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. विलंब शुल्कासह ८ मार्च आणि अतिविलंब शुल्कासह १० मार्च पर्यंत ही मुदत असेल.सदर परीक्षेकरिता ज्या शाळांनी अद्याप ऑनलाईन आवेदनपत्र भरले नसतील त्यांनी दिलेल्या मुदतीत सदर प्रक्रिया पूर्ण करावी. १० मार्च २०२६ नंतर कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन अथवा ऑफलाईन पद्धतीने आवेदनपत्र भरता येणार नाहीत याची सर्वांनी गांभीर्याने नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा परिषदेमार्फत करण्यात आले आहे.


## कागदपत्रे हरवले

माझी संजीवकुमार साहेबराव जाधव या नावाची इयत्ता १० वी व १२ वी शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रं प्रवासात गहाळ झाले आहेत. त्यात १० वी व १२ वीचा मार्कमेमो व सनद असून, ज्यांना कोणाला सापडले असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता– संजीवकुमार साहेबराव जाधव**
**रा. नाईकनगर, नांदेड**
**मो. ९८२२६६७८९०**

## हरवली आहे

मी नामदेव गोविंदराव धोपटे रा. नांदेड दि. २७/०२/२०२६ रोजी नांदेड ते कंधार बस प्रवास करीत असताना दि. १६ ऑगस्ट २०१७ रोजी केलेली प्लॉटची सौदाचिठ्ठी हरवली आहे. तरी कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**-: संपर्क पत्ता :-**
**नामदेव गोविंदराव धोपटे**
**रा. सिद्धनाथपुरी, नांदेड मो.नं. ८०१००२६०३९**

## टी.सी. हरवली

माझी मोनीका महेंद्र पंडित या नावाची १२ वी पास कला शाखेची टी.सी. परभणी ते नांदेड रेल्वे प्रवासादरम्यान गहाळ झाली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

पत्ता :- मोनीका महेंद्र पंडित
रा. एन.डी. १२०, शंकरनगर,
गुरुवार बाजार, सिडको नांदेड

हरीओम पार्क फ्लॅट ओनर्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.
मर्या.सावरकरनगर,पूर्णा रोड,वाडी (बु.) नादेड

जाहीर प्रगटन

हरीओम पार्क फ्लॅट ओनर्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.सावरकरनगर,पूर्णा रोड,वाडी (बु.) नादेड या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक सन २०२५-२६ ते २०३०-३१ साठीची प्रारूप मतदान यादी संस्थेचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर येथे "हरीओम पार्क" लावण्यात आलेली आहे. सदर मतदान यादीवर संस्थेच्या सभासदापैकी कुणाचा आक्षेप असल्यास दिनांक ०१/०३/२०२६ ते १०/०३/२०२६ पर्यंत संस्थेचे अध्यक्ष/सचिव व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात आक्षेप नोंदवावेत. कृपया सदर तारखेनंतर आलेले आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची सभासदांनी नोंद घ्यावी.

(संतोष के.सरकटे)
निवडणूक निर्णय अधिकारी
हरीओम पार्क फ्लॅट ओनर्स सहकारी गृहनिर्माण संस्था
मर्या.सावरकरनगर,पूर्णा रोड,वाडी (बु.) नादेड
मोबाईल :- ९७६७१००५५८

अध्यक्ष-सचिव
हरीओम पार्क फ्लॅट ओनर्स सहकारी गृहनिर्माण संस्था
मर्या.सावरकरनगर,पूर्णा रोड,वाडी (बु.) नादेड
मोबाईल :- 8888807626

जी.व्ही.सी.सप्तगिरी ग्रीन्स-II मेंन्टेनन्स अँण्ड बेटरमेंन्टे सव्हीसेस को-ऑप.सो.लि.कौठा नांदेड ता.जि.नांदेड

जाहीर प्रगटन

जी.व्ही.सी.सप्तगिरी ग्रीन्स-II मेंन्टेनन्स अँण्ड बेटरमेंन्टे सव्हीसेस को-ऑप.सो.लि.कौठा नांदेड ता.जि.नांदेड या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक सन २०२५-२६ ते २०३०-३१ साठीचीं प्रारूप मतदान यादी संस्थेचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर "जी.व्ही.सी.सप्तगिरी ग्रीन्स-II " येथे लावण्यात आलेली आहे. सदर मतदान यादीवर संस्थेच्या सभासदापैकी कुणाचा आक्षेप असल्यास दिनांक ०५/०३/२०२६ ते १४/०३/२०२६ पर्यंत संस्थेचे अध्यक्ष/सचिव व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात आक्षेप नोंदवावेत. कृपया सदर तारखेनंतर आलेले आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची सभासदांनी नोंद घ्यावी.

(संतोष के.सरकटे)
निवडणूक निर्णय अधिकारी
जी.व्ही.सी.सप्तगिरी ग्रीन्स-II मेंन्टेनन्स अँण्ड बेटरमेंन्टे सव्हीसेस को-ऑप.सो.लि.कौठा नांदेड ता.जि.नांदेड
मोबाईल :- ९७६७१००५५८

अध्यक्ष-सचिव
जी.व्ही.सी.सप्तगिरी ग्रीन्स-II मेंन्टेनन्स अँण्ड बेटरमेंन्टे सव्हीसेस को-ऑप.सो.लि.कौठा नांदेड ता.जि.नांदेड
मोबाईल :- 9309500263
9403206730

गुजराती शिक्षण संस्था, नांदेड संचलित
गुजराती हायस्कूल, नांदेड.

गुजराती हायस्कूल, वजीराबाद, नादेड ( अल्पभाषीक शाळा ) येथे शासन निर्णयाच्या अधिन राहून अनुदानीत पदावर खालील प्रमाणे जागा भरावयाची आहे. इच्छुक उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक व व्यवसायीक पात्रतेच्या सत्यप्रती सह लेखी अर्ज दिनांक 12.03.2026 रोजी पर्यंत शाळेच्या कार्यालयीन वेळात ( सुट्टीचे दिवस वगळून ) आपल्या स्वखर्चाने गुजराती हायस्कूल, वजीराबाद, नांदेड येथे हस्तपोच करावे.

| अ. क्रं | पदाचे तपशील | विषय | शैक्षपणिक पात्रता | व्यवसायीक पात्रता | पद संख्या | टी.ई.टी/ सी.टी.ई.टी. आवश्यक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सहशिक्षक | भूगोल | बी.ए. | बी.एड. | 01 | होय |

नोट :-

1. उमेदवारांना तोंडी मुलाकातीसाठी शाळेकडून संपर्क करण्यांत येईल, त्या अगोदार उमेदवारांनी प्रत्यक्ष किंवा इतर माध्यम द्वारे संपर्क करु नये.
2. उमेदवारांनी तोंडी मुलाकातीस येतांना सोबत आपले लेखी स्वरुपात लिहलेले अर्ज व शैक्षणिक आणि व्यवसायीक पात्रतेच्या मूळ प्रमाणपत्रसह हजर राहावे.
3. तोंडी मुलाकातीस दिलेल्या वेळ पुर्वी शाळेत हजर होणे आवश्यक आहे. वेळे नंतर आलेल्या उमेदवारास मुलाकातीसाठी विचार केला जाणार नाही.
4. उमेदवारांचे निवडीचे अधिकार हे शाळा प्रशासन कडे असेल.

अध्यक्ष
मुख्याध्यापक तथा पदसिध्द सचिव
शालेय समिती, गुजराती हायस्कूल, नांदेड

VEHICLE FOR SALE

Offer for sale of Vehicle on As is Where is Basis

| Vech no | Year | Model |
|---|---|---|
| MH-38-V-7956 | 2021 | TRACTOR ITLSONALIKA SOLISYAN 750RX DI |
| | | |
| | | |

All offer may of exclusive of TAX where applicable. The purchaser shall have to take all necessary steps for transferring the vehicle in his name with the RTO. Offer should reach us on or before **13/03/2026.** Offer reach after the sold date the company reserve the right to reject any or all the offer without assigning any reason what so ever. The company does not undertake any responsibility for non-receipt/loss/delay of offer documents during transit. The offer should be sent to the following address.

SUNDARAM FINANCE LIMITED
IInd Floor, Parmar complex, Bafna T- Point , Nanded 431601
Ph- 9860810421,9987006249,

## Change In Name

My Old Name is **ADIBA TARNNUM SK ALEEM** which now I am changing as New Name **ADIBA TARUNNUM SHAIKH ALEEM** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - H.No. 1-7-904, Peerburhan Nagar, Near A-1 Kirana Nanded Maharashtra 431605
Mo.No. 7249398871

## Change In Name

My Old Name is **Supriya Manik Damanwad** which now I am changing as New Name **Supriya Gopinath Gopwad** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - **Supriya Gopinath Gopwad**
Jagdish Nagar, Taroda Bk. Nanded Nanded
Mo.No. 8806395834

## Change In Name

My Old Name is **Shivnanda Dharmaji Niwdange** which now I am changing as New Name **Mayawati Prakashrao Sawant** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - **Prakashrao Kishanrao Sawant**
Plot No. 99, Kalayan Nagar, Taroda (Bk.), New Raj Corner, Nanded 431605
Mo.No. 9766487373

4000 x 4 =16000 इस्क्वायर फूट
4 मजली हॉस्पिटल, लॉजिंग, बोर्डिंग, ऑफिस, यासाठी किरायाने देणे आहे
9763226190
7972231307
पत्ता : कामठा बायपास गट नं. 2015 प्लॉटनं. 2 गुरुकृपा कॉप्लेक्स, शंकरराव चव्हाण चौक, नांदेड-431605

## Change In Name

My Old Name is MOHAMMAD MUJTABA MUJAHED SIDDIQUI Which now I am changing as new Name MOHAMMAD MUJTABA Hence Forth my all Correspondance will be done as per my new name please consider the Same.
Sign By : MUJAHED SIDDIQUE
Address : H.NO.6-2-112 Mohella Sayyadan Near Islahul Amal P.S Sayyadan Nanded-431604
Mob.No : 986053767

## Change In Name

Old name. MIRZA ASMABEGUM SAMIULLABEIG New Name. ASMA BEGUM SHAIKH WAHAJ
Address.
Plot No 48 Survey No 17/2, Degloor Naka, Behind Hamza Masjid, Millat Nagar, Itwara Nanded, PO: Itwara Nanded, DIST: Nanded, Maharashtra - 431604
Mobile number. 8390169111

## Change In Name

Old name HUZBUNNISA LUQMAN SYED New name HUZBUNNISA MIRZA MAJIDBAIG
Address.
sr no 163/a, plot no 150, mohammadiya colony, degloor naka, Itwara Nanded, PO: Itwara Nanded, DIST: Nanded, Maharashtra - 431604
Mobile number. 8698182889

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश

## विभागीय आयुक्तांनी अधिकाऱ्यांशी दूरदृश्य प्रणालीद्वारे साधला संवाद

**नांदेड (प्रतिनिधी)** –विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागामार्फत ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

या अनुषंगाने गुरुवार, दि. ५ मार्च २०२६ रोजी नांदेड जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी (बीडीओ) तसेच ग्रामपंचायतींचे सरपंच यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधण्यात आला.

या संवादादरम्यान विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. महसूल विभागाशी संबंधित सेवा तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे



पोहोचविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच अकृषिक रुपांतरणासाठी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक नसणे, सनद प्रणाली, संपुष्टात आणण्याची प्रक्रिया, एकवेळचे अधिमूल्य भरण्याची नवी तरतूद, तुकडेबंदी कायद्यातील सुधारणा तसेच अभिलेख अद्ययावत करण्यासंदर्भातील विविध सुधारणा यांची माहिती ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक जनजागृती व प्रसार अभियान राबविण्याचे निर्देश दिले.

याशिवाय महसूल विभागाबरोबरच इतर शासकीय विभागांच्या सेवांबाबत नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी योग्य नियोजन करण्यास सांगण्यात आले. नागरिकांच्या दीर्घकालीन प्रलंबित तक्रारी तसेच दैनंदिन सेवा एकाच खिडकीतून मंडळस्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या समाधान शिबिरांद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. तसेच या अभियानाची माहिती प्रत्येक गावातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक प्रचार व प्रसिद्धी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ग्रामसभा, दवंडी, सूचना फलक, सोशल मीडिया तसेच इतर माध्यमांचा वापर करून नागरिकांना शिबिरांची माहिती देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले. गावपातळीवर आयोजित करण्यात येणाऱ्या महाराजस्व समाधान शिबिरांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन महसूलविषयक अडचणी व प्रलंबित बाबी मांडाव्यात, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# अवैध प्रवाशी वाहनांविरुद्ध धरपकड मोहीम; दीडशे वाहनांवर कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील शहर वाहतूक शाखेने अवैध प्रवाशी वाहतूक, विना वाहन परवाना चालणारी वाहने व इतर यांच्यावर धडक कारवाई करून १४९ वाहनांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

शहरात वाढत असलेली ट्राफिक समस्या आटोक्यात आणण्यासाठी शहरात चालणारी अवैध प्रवाशी वाहतूक तसेच विना परवाना/परमिट चालणारे वाहणे, भरधाव वेगाने चालणारी वाहने, फटाका बुलेट यांच्यावरती कारवाई करण्याची मोहीम राबविण्याचे आदेश पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी वजिराबाद शहर वाहतूक शाखेला दिले होते.

त्या अनुषंगाने दि. ४ मार्च रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन रेल्वे स्टेशन रोड, महावीर चौक, कलामंदिर, वर्कशॉप, राजकॉर्नर व छत्रपती चौक या ठिकाणी वाहनांची कागदपत्रे तपासणी केली. सोबतच ऑटो चालकांना गणवेश परिधान करण्याबाबत सुचना दिल्या. वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर, ट्रिपल सिट वाहने, परवाना नसलेली वाहने व इतर यांच्यावर कारवाई करुन १४९ केसेस करण्यात आल्या आहेत.

वाढत असलेल्या ट्राफीकमुळे लोकांनी त्यांची चार चाकी/दोन चाकी वाहने कुठेही पार्क न करता पार्कीगचे ठिकाणी पार्क करावे, वाहतुकीस अडथळा निर्माण होईल या प्रकारे कोणतेही फळ गाडे व इतर असे रस्त्यामध्ये लावून अतिक्रमण करू नये, सिग्नलचे पालन करावे व वाहतुकीस अडथळा होईल अशी कोणतीही कृती करू नये व पोलीस प्रशासनास सहकार्य करावे अन्यथा मोटार वाहन कायदा व इतर कायद्यान्वये कडक कारवाई करण्यात येईल. बाबत पोलीस प्रशासनाच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

# नांदेड मनपाच्या अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी एक वर्षाच्या मुलाची केली सुखरूप सुटका

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील केशवनगर हनुमानगड नांदेड कमानीमध्ये वृंदावन निवासस्थानी ५ मार्च रोजी दुपारी २ वाजता इमारतीच्या पहिल्या माळ्यावर एक वर्षाच्या शिवांश सतीश कंकरे हा खेळत असताना रूमच्या आतमध्ये दरवाजा बंद झाला. या घनेची माहिती सतीश कंकरे यांनी अग्निशमन विभागास संपर्क करून दिली. नंतर अग्निशमक दलाचे अधिकारी के. एस. दासरे व कर्मचाऱ्यांनी तातडीने संबंधित निवासस्थानी रेस्कुय वाहनाने जाऊन बालकांची सुखरूप सुटका केली.

सदरील बातमी अग्निशमन विभागाला मिळाली असता तत्काळ रेस्क्यू वाहन अधिकारी कर्मचाऱ्यांसह घटनेच्या ठिकाणी वेळीच पोहोचले. घटनास्थळी पोहोचताच इमारतीच्या पाठीमागच्या बाजूने खिडकीच्या ठिकाणी ३५ फिट ॲल्युमिनियम एक्सटेन्शन लेडर लावून खिडकीच्या आतमध्ये फायर



हुकद्वारे बंद झालेल्या दरवाजाची कडी काढण्यात आली व लहान बालकाला त्याच्या माता, पिता यांच्याजवळ सुखरूप सोपवण्यात आले.

या रेस्क्यू कॉलवर अग्निशमन अधिकारी के. एस. दासरे व उपअग्निशमन अधिकारी निलेश कांबळे, उमेश ताटे, नरवाडे, मगरे, पठाण व वाहन चालक एस. नरवाडे वेळीच पोहोचले आणि त्यांनी ही कार्यवाही यशस्वी केली.

समाजकल्याण योजनांची चित्ररथाद्वारे जनजागृती

# जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दाखवली चित्ररथाला हिरवी झेंडी




**नांदेड (प्रतिनिधी)**– समाज कल्याण विभागाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी एलईडी चित्ररथाद्वारे जिल्ह्यात जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेच्या चित्ररथाला गुरुवारी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात आयोजित या कार्यक्रमास प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी प्रमोद धोंगडे, उपसंपादक अलका पाटील, लेखा लिपीक अनिल चव्हाण उपस्थित होते. हा चित्ररथ जिल्ह्यातील विविध गावांमध्ये जाऊन समाज कल्याण विभागाच्या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणार असून, लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर अभियान उद्या सोनखेडमध्ये

**नांदेड (प्रतिनिधी)**– लोहा तालुक्यात ७ मार्च ते ८ मे २०२६ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर अभियान टप्पा १ चे मंडळनिहाय शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी परिसरातील नागरिकांनी या शिबिरास मोठ्या संख्येने उपस्थित राहून, आपल्या प्रलंबित कामाचा निपटारा करून घ्यावा, असे आवाहन लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी केले आहे.

त्यानुसार लोहा तालुक्यात ७ मार्च रोजी सोनखेड या ठिकाणी सामान्य जनतेच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजना थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी लोहा प्रशासनाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर अभियान टप्पा १ चे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर ७ मार्च रोजी सकाळी १० वाजता हनुमान मंदिर परिसर, पोलीस स्टेशनच्या समोर सोनखेड येथे संपन्न होणार आहे. प्रशासकीय पारदर्शकता आणि गतिमानता वाढवण्यासाठी हे शिबीर आयोजित केले आहे.

# चेन्नई एक्सप्रेसमध्ये २ अतिरिक्त एसी ३–टियर डब्यांची तात्पुरती वाढ


**नांदेड (प्रतिनिधी)**– प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन आणि प्रवाशांना अधिक सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वेने गाडी क्र. १६००३/१६००४ चेन्नई – नगरसोल – चेन्नई एक्सप्रेसमध्ये तात्पुरत्या स्वरूपात अतिरिक्त डबे जोडण्याचा निर्णय घेतला आहे.

सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार या गाडीची रचना २० डब्यांवरून २२ डब्यांपर्यंत वाढविण्यात येणार असून, त्यामध्ये २ अतिरिक्त एसी ३–टियर डबे जोडण्यात येणार आहेत. ही तात्पुरती वाढ पुढीलप्रमाणे लागू राहील. गाडी क्र. १६००३ (चेन्नई नागरसोल) : ८ मार्च ते ५ एप्रिल (निर्धारित दिवसांवर) गाडी क्र. १६००४ (नागरसोल – चेन्नई) : ९ मार्च ते ६ एप्रिल (निर्धारित दिवसांवर). या बदलानंतर गाडीची एकूण रचना २२ डबे अशी असेल, असे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

# सिंचन प्रकल्पांबाबत राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी खा. अशोकराव चव्हाण व आ. श्रीजया चव्हाण यांची चर्चा

**नांदेड (प्रतिनिधी)** – माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण आणि भोकर विधानसभा मतदारसंघाच्या भाजपा आमदार श्रीजया चव्हाण यांनी गुरुवारी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची मुंबई येथे भेट घेऊन नांदेड जिल्ह्यातील विविध सिंचन प्रकल्पांना गती देण्याबाबत व निधी उपलब्धतेबाबत विचारविनिमय केला.

मंत्रालयातील विखे पाटील यांच्या कार्यालयात झालेल्या या बैठकीत खा. अशोकराव चव्हाण आणि आ. श्रीजया चव्हाण यांनी रेणापूर सुधा प्रकल्पाची उंची १.१० मीटरने वाढविण्याच्या कामासंदर्भात चर्चा केली. या प्रकल्पाच्या कामासाठी तसेच शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मावेजा देण्याकरिता निधी उपलब्ध करून



देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

पिंपळढव साठवण तलावाबाबत संवाद साधताना या प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम करण्यासाठी, भूसंपादन व वन जमीन वळती करण्यासाठी तसेच बुडीत क्षेत्रातील उंच पुलाचे काम, डौरवाडी ते धरणस्थळ व पिंपळढव ते धरणस्थळचा पोहोच रस्ता आणि इतर अनुषंगिक कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे करण्यात आली.

नांदेड जिल्ह्यातील उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर धरणाची तूट भरून काढण्यासाठीची खरबी वळण योजना, पेनगंगा नदीवरील ७ उच्च पातळी बंधारे कालवे आणि पेनगंगा प्रकल्पाच्या कालव्याच्या अस्तरीकरणाची कामे करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी खा. अशोकराव चव्हाण व आ. श्रीजया चव्हाण यांनी याप्रसंगी केली.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र सुधारणा कार्यक्रम अंतर्गत डॉ. शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प व उर्ध्व पेनगंगा प्रकल्प तसेच सुधा बृहद लघु पाटबंधारे प्रकल्पाला निधी मिळणे, अर्धापूर नगरपंचायतीच्या हद्दीतील जलसंपदा विभागाच्या मालकीच्या जागेवर नमो उद्यान विकसित करणे, मुदखेड येथील जलसंपदा विभागाची जमीन न्यायालय तसेच न्यायाधीशांचे निवासस्थान आणि ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्रासाठी हस्तांतरीत करणे आदी विषयांवरही या बैठकीत चर्चा झाली.

# परशुराम चौकाचे तत्काळ सुशोभिकरण करा –लातूरकर

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील परशुराम चौकाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, परशुराम जयंतीपूर्वी या चौकाचे महापालिकेने सुशोभिकरण करावे, अशी मागणी अ. भा. ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून परशुराम चौकात अवकळा पसरली आहे. कुठलीही साफसफाई होत नसल्यामुळे कचऱ्यांचा खच साचला आहे. काही भागाची मोडतोड सुद्धा झाली आहे. या भागाचे सुशोभिकरण करणे आवश्यक आहे. येत्या १९ एप्रिल रोजी परशुराम जयंती असून, त्यानिमित्त या चौकात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. सुशोभिकरणाचे काम त्वरित हाती घेऊन जयंतीपूर्वी ते पूर्ण करावे, अशी मागणी लातूरकर यांनी केली आहे. विशेष म्हणजे महापालिका प्रशासनाच्यावतीने नुकत्याच जाहीर केलेल्या १०० दिवसांच्या विकास कामांच्या यादीमध्ये परशुराम चौकाच्या



सुशोभिकरणाचाही समावेश करावा, अशी मागणी निखिल लातूरकर यांनी नूतन महापौर, उपमहापौर आणि मनपा आयुक्त यांच्याकडे केली आहे.

# गंगाबेट आखाड्यावर दोघांना जबर मारहाण करून लुटले; अनोळखी दोघांवर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत जबरी चोरीची घटना घडली आहे. दि. ३ मार्च रोजी पहाटे २ वाजण्याच्या सुमारास गंगाबेट येथील शेतातील आखाड्यावर दोन अनोळखी चोरट्यांनी संगनमत करून फिर्यादी व त्यांच्या वडिलांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून लुटले. या प्रकरणी अनोळखी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या मारहाणी दरम्यान आरोपींनी फिर्यादीच्या अंगावरील १ लाख १० हजार रुपये किमतीचे चांदीचे दागिने जबरदस्तीने काढून नेल्याची तक्रार देण्यात आली आहे. याप्रकरणी द्रौपदाबाई माणिकराव इरकर (वय ६०, रा. गंगाबेट, ता. जि. नांदेड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू आहे.

### हनुमानगड भागात घरामध्ये अडकलेल्या बालकाची सुटका

शहराच्या केशवनगर हनुमान गड परिसरात गुरुवार, दि. ५ मार्च रोजी दुपारी दोनच्या सुमारास वृंदावन निवास या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर एक वर्षांचा शिवांश सतीश कंकरे हा निरागस बालक खेळत असताना अचानक रूमचा दरवाजा आतून लॉक झाला. घरातील मंडळींमध्ये क्षणभर घबराट पसरली. सतीश कंकरे यांनी तात्काळ अग्निशमन विभागाशी संपर्क साधून मदतीची विनंती केली.

सदर माहिती मिळताच अग्निशमन विभागाने क्षणाचाही विलंब न लावता रेस्क्यू वाहन अधिकारी व कर्मचारी यांच्यासह घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळी पोहोचताच इमारतीच्या पाठीमागील बाजूस ३५ फूट ॲल्युमिनियम एक्सटेन्शन लेडर लावून खिडकीमार्गे आत प्रवेश करण्याची योजना आखण्यात आली. फायर हुकच्या साहाय्याने आतून बंद झालेल्या दरवाजाची कडी काढण्यात आली, आणि या प्रकारामुळे बालकाची सुटका केली.

# माहूर तालुक्यातील इवळेश्वर येथे जल अर्पण दिवस साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** –जलजीवन मिशनच्या हर घर, नल से जल या योजनेअंतर्गत गावातील प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे नियमित पाणीपुरवठा करण्यात येत असून, ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शुद्ध व सुरक्षित पाणी देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत, त्यामुळे गावकरी समाधानी आहेत, असे प्रतिपादन इवळेश्वरच्या सरपंच वंदनाताई दुधराम राठोड यांनी जल अर्पण दिवस कार्यक्रमात केले.

केंद्र व राज्य शासनाच्यावतीने जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर नल से जल' घोषित गावांमध्ये नियमित पाणीपुरवठा सुरू असलेल्या ठिकाणी जल अर्पण दिवस साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार माहूर तालुक्यातील अतिदुर्गम भागातील इवळेश्वर येथे हा दिवस आज मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी आरोग्य विस्तार अधिकारी शिवचरण जाधव यांनी सांगितले की, गावात नियमित पाणीपुरवठ्यासोबतच गुणवत्तापूर्ण पाणी देण्यावरही भर देण्यात येत असून, पुढील काळातही हा पुरवठा सातत्याने सुरू राहावा यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. माहूर तालुक्याचे उपविभागीय अभियंता प्रमोद बनसोड यांनी सांगितले की, गावातील पाणीपुरवठा योजना जलदगतीने व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यात आली असून, गावातील सर्व कुटुंबांना नळ जोडणी देण्यात आली आहे. भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन ही योजना उभी करण्यात आली असून, गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे प्रशासनाला ही योजना यशस्वीपणे राबवता आली. यावेळी पाणीपुरवठा योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करण्यात आली.

कार्यक्रमाच्या निमित्ताने सकाळी ग्रामस्थांच्या सहभागातून ग्रामस्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालयापासून नळ योजनेच्या पाण्याच्या टाकीपर्यंत व गावातील मुख्य रस्त्यांवरून जल रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये शालेय विद्यार्थी, महिला, ग्रामस्थ तसेच गावातील शासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सहभागी नागरिकांनी पाणी संवर्धनासंबंधी घोषवाक्यांचे फलक हातात घेऊन जनजागृतीपर घोषणा दिल्या.

या कार्यक्रमास आरोग्य विस्तार अधिकारी आर. एस. गावंडे, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे माहिती, शिक्षण व संवाद सल्लागार डॉ. नंदलाल लोकडे, पाणी गुणवत्ता समन्वयक के. पी. देसाई, ग्रामपंचायत सदस्य संतोष जाधव, शिवाजी राखोंडे, कनिष्ठ अभियंता सुशील वसमते, आरोग्य सहाय्यक पी. आर. मटचे, पोलीस पाटील आतीश राठोड, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष अर्जुन जाधव, एमपीडब्ल्यू व्ही. के. पोटे, शिवाजीराव राखोंडे, पाणीपुरवठा कर्मचारी ओमप्रकाश राठोड, गणेश भांडवले, बंडू राठोड, आशीर्वाद पतंगे, राजय भांडवले यांच्यासह अंगणवाडी सेविका, आशा वर्कर,



ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ग्रामपंचायत अधिकारी राजू सरोदे यांनी केले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com